ePaper

| वर्ष - 9 । अंक -138 | UDYAM-MH-26-0158827 |

**उद्धव ठाकरे यांचे छत्रपती संभाजीनगरमध्ये जाऊन अमित शाहांना ओपन चॅलेंज!**



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- डीवाय पाटीलवर ब्रंट-कौरचे वादळ!
- सुनील गावस्कर यांनी केली वचनपूर्ती!
- कोरिया अन् उत्तर कोरियात तणाव
- मंदिरात नमाज पठण करण्याचा प्रयत्न


www.mahaenews.com । रविवार, दि. 11 जानेवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**महाराष्ट्र हादरला : माजी पोलीस महासंचालकांचा प्रताप उघड**

# भाई-भाऊंना अडकवण्याचा कट!

## महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर गृह विभागाचा धक्कादायक अहवाल

। मुंबई/ठाणे ।
प्रतिनिधी । महाईन्यूज

**महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय वातावरण तापले असतानाच, महाराष्ट्राच्या गृह विभागातून समोर आलेल्या एका विशेष चौकशी अहवालामुळे मोठी खळबळ उडाली आहे. या अहवालात २०२१ साली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना खोट्या गुन्ह्यात अडकवण्याचा प्रयत्न झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, हा प्रयत्न माजी पोलीस महासंचालक संजय पांडे यांच्या दबावाखाली झाल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे.**




### ‘फडणवीसांसह आम्हालाही जेलमध्ये टाकण्याचा कट’–नितेश राणे

मंत्री नितेश राणे यांनी या प्रकरणाला “सत्तेच्या गैरवापराचं जिवंत उदाहरण” असे संबोधले. ते म्हणाले, “महाविकास आघाडीच्या काळात देवेंद्र फडणवीस यांना तुरुंगात टाकण्याचा कट होता. आमच्यासारख्या अनेक विरोधी नेत्यांवर खोटे गुन्हे दाखल करून जेलमध्ये टाकण्याचा प्रयत्न झाला. कोरोनाच्या काळात राज्याचा कारभार पूर्णतः नियोजनशून्य होता, मात्र विरोधकांना अडकवण्यावरच सरकारचा भर होता.”

- **फडणवीस-शिंदेंना अटक करण्याचे निर्देश दिल्याचा आरोप**
- **माजी डीजीपी संजय पांडे अडचणीत**
- **ऑडिओ क्लिपचा अहवालात उल्लेख**
- **राजकीय आरोप-प्रत्यारोपांना उधाण**

हा अहवाल नुकत्याच निवृत्त झालेल्या माजी पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी त्यांच्या निवृत्तीच्या अवघ्या चार दिवस आधी सरकारकडे सादर केला होता. अहवाल सार्वजनिक होताच राज्याच्या राजकारणात एकच खळबळ उडाली असून, पोलीस यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर आणि तत्कालीन सत्ताधाऱ्यांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

**‘यूएलसी’त अडकवण्याचा प्रयत्न?**

विशेष चौकशी अहवालानुसार, माजी डीजीपी संजय पांडे यांनी ठाण्याचे तत्कालीन डीसीपी लक्ष्मीकांत पाटील आणि एसीपी सरदार पाटील यांच्यावर दबाव टाकत २०१६ मधील अर्बन लँड सीलिंग (यूएलसी) घोटाळ्याच्या प्रकरणात देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांना अटक करण्याचे निर्देश दिले होते. या कथित कारवाईमागे फडणवीस आणि शिंदे यांनी बिल्डरांकडून पैसे उकळल्याचा बनाव उभा करण्याचा हेतू असल्याचा आरोप अहवालात करण्यात आला आहे. अहवालात असेही नमूद करण्यात आले आहे की, या प्रकरणात संबंधित पोलिस अधिकाऱ्यांवर सातत्याने दबाव टाकण्यात आला. तपासाच्या प्रक्रियेत नियमबाह्य हस्तक्षेप करण्यात आल्याचा आरोप असून, संपूर्ण प्रकरण राजकीय सूडबुद्धीने प्रेरित असल्याचा दावा केला जात आहे.

**ऑडिओ क्लिपमुळे प्रकरणाला नवे वळण**

या प्रकरणात अटक करण्यात आलेले संजय पुनामिया यांनी सादर केलेल्या एका ऑडिओ क्लिपचाही चौकशी अहवालात उल्लेख करण्यात आला आहे. या ऑडिओमध्ये एसीपी सरदार पाटील, डीजीपी संजय पांडे आणि डीसीपी लक्ष्मीकांत पाटील यांच्यातील कथित संभाषण असल्याचा दावा करण्यात आला आहे. या संभाषणात देवेंद्र फडणवीस यांना या प्रकरणात कसे गोवायचे, याबाबत चर्चा झाल्याचा उल्लेख अहवालात आहे.

**तपासाशी संबंध नसतानाही हस्तक्षेपाचा आरोप**

अहवालात पुढे असे नमूद करण्यात आले आहे की, संजय पुनामिया आणि सुनील जैन यांना कोपरी पोलीस ठाण्यात अटक करण्यात आल्यानंतर ठाण्याचे तत्कालीन डीसीपी (गुन्हे) लक्ष्मीकांत पाटील यांनी यूएलसी घोटाळ्याबाबत त्यांची चौकशी केली. प्रत्यक्षात हे अधिकारी या तपासाशी थेट संबंधित नसतानाही त्यांनी हस्तक्षेप केल्याचा आरोप चौकशी अहवालात करण्यात आला आहे.

**राजकीय आरोप-प्रत्यारोप**

हा अहवाल समोर येताच राज्याच्या राजकारणात आरोप-प्रत्यारोपांची मालिका सुरू झाली आहे. उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी या अहवालावर संशय व्यक्त केला आहे. रश्मी शुक्ला या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित असल्याचा दावा करत, त्यांच्या कुटुंबातील अनेक सदस्य संघाचे कार्यकर्ते असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे हा अहवाल पक्षपाती असून, त्यामध्ये तथ्य नसल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला आहे.

**‘संजय पांडे यांच्यावर कुणाचा दबाव होता?’ – आशिष शेलार**

या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना भाजपचे नेते आशिष शेलार यांनी गंभीर सवाल उपस्थित केले आहेत. ते म्हणाले, “हा प्रकार तपास यंत्रणांनी उघडकीस आणला आहे. मात्र प्रश्न असा आहे की संजय पांडे यांच्यावर कुणाचा दबाव होता? आदेश कोणी दिला? त्या काळात मुख्यमंत्री आणि गृहमंत्री कोण होते? देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांना तुरुंगात टाकण्यासाठीच हा कट रचण्यात आला.”

**‘खोटी कागदपत्रे, बनावट चित्रफिती तयार केल्या’–अमित साटम**

भाजपचे नेते अमित साटम यांनी महाविकास आघाडी सरकारवर तीव्र शब्दांत टीका केली. ते म्हणाले, “२०१९ ते २०२२ या काळात महाराष्ट्रात अराजकतेचे वातावरण होते. विरोधकांवर खोटे गुन्हे दाखल करून त्यांना जेलमध्ये टाकण्याचा कार्यक्रम सुरू होता. देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यावर गुन्हा नोंदवण्यासाठी खोटी कागदपत्रे आणि चित्रफिती तयार करण्यात आल्या.

नागरिकांनी काँग्रेसला हात द्यावा भाजपच्या नागरिकांच्या समस्यांचे काही देणे घेणे नाही

# आता गप्प बसायचं नाही!

## सपकाळ यांची भाजपवर टीका

।पुणे।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भाजपच्या प्रतिनिधींना नागरिकांच्या समस्यांचे काही देणे घेणे नाही, असा आरोप कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी येथे केला. मुकुंद नगर – सॅलेसबरी पार्क प्रभागातील कॉंग्रेस -शिवसेना-मनसे आघाडीचे उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत सपकाळ यांनी भाजपवर जोरदार टीका केली. यावेळी उमेदवार पुष्कर अबनावे ( अ गट ),डॉ. स्नेहल पाडळे (ब गट ), योगिता सुराणा ( क गट ),अक्षय जैन (ड गट ) हे उपस्थित होते. आता गप्प बसायचं नाही... आता लढायचं! असा निर्धार यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी केला. तडजोडीची नाही — लढ्याची, गुलामीची नाही — स्वाभिमानाची, संविधान रक्षणाची असल्याचे मत उपस्थित वक्त्यांनी व्यक्त केले.**



सपकाळ यांनी भाजपवर जोरदार टीका केली. ते म्हणाले "भाजपच्या लोकप्रतिनिधींना नागरिकांच्या समस्यांविषयी काही देणे घेणे नाही. सत्तेचा गैरवापर त्यांच्याकडून सुरू आहे. भाजपची सत्ता जिथे जिथे आहे तेथे हा प्रकार आपल्याला पाहायला मिळत आहे. देशाची घटना आणि धर्मनिरपेक्षता सार्वभौमत्व आदी संरक्षक करण्यासाठी नागरिकांनी काँग्रेसला हात द्यावा असे आवाहनही सपकाळ यांनी केले.यावेळी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते मुकुंद नगर सॅलेसबरी पार्क मधील नागरी समस्या सुटल्या नाहीत. या प्रभागात सत्ताधारी भाजपचेच नगरसेवक होते परंतु या भागातील कचरा पिण्याचा पाण्याचा प्रश्न तसेच पावसाळ्यातील नाल्याला येणाऱ्या पुराच्या धोक्यापासून वस्ती भागाला संरक्षित करण्यासाठी कोणतीच उपाययोजना केली गेली नाही. या भागातील लोकप्रतिनिधींनी केवळ जुन्या बांधकामाचा पुनर्विकासावरच जास्त भर दिला असा आरोपही काँग्रेसच्या उमेदवारांनी यावेळी केला. या भागातील पाणीपुरवठा संदर्भात पाण्याची टाकी बांधण्यात आली परंतु अद्यापि कार्यान्वित केली गेली नाही तसेच या भागातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी उभारण्यात आलेला उड्डाणपूल देखील चुकीच्या पद्धतीने केला गेला. गंगाधाम चौकातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी अद्यापही ठोस आराखडा सत्ताधारी भाजपकडून केला गेला नाही, असा आरोप उमेदवारांनी केला.राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सत्ताधारी पक्षाकडून मोठ्या प्रमाणात गुंडगिरी केली जात आहे. उमेदवारांना धमकावले जात आहे, पैशांचे आमिष दाखवून अर्ज भरु दिला जात नाही किंवा मागे घेण्यास भाग पाडले जात आहे. पोलीस यंत्रणा, प्रशासन व निवडणूक आयोग सत्ताधारी पक्षाचे बटिक बनले आहे. लोकशाहीत निवडणुका निकोप, पारदर्शक व भयमुक्त वातावरणात पार पडल्या पाहिजेत पण त्याला हरताळ फासला आहे. सत्तेचा खेळ नाही तर लोकशाही वाचवण्यासाठी काँग्रेसची लढाई आहे, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.घेणे नाही, असा आरोप कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी येथे केला. मुकुंद नगर – सॅलेसबरी पार्क प्रभागातील कॉंग्रेस -शिवसेना-मनसे आघाडीचे उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत सपकाळ यांनी भाजपवर जोरदार टीका केली.

### आता गप्प बसायचं नाही

यावेळी उमेदवार पुष्कर अबनावे ( अ गट ),डॉ. स्नेहल पाडळे (ब गट ), योगिता सुराणा ( क गट ),अक्षय जैन (ड गट ) हे उपस्थित होते. आता गप्प बसायचं नाही... आता लढायचं! असा निर्धार यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी केला. तडजोडीची नाही — लढ्याची, गुलामीची नाही — स्वाभिमानाची, संविधान रक्षणाची असल्याचे मत उपस्थित वक्त्यांनी व्यक्त केले.सपकाळ यांनी भाजपवर जोरदार टीका केली.

# तुमच्या समस्येसाठी तुमच्या दारी येणार

## फिरते समस्या निवारण कार्यालय सुरू करणार; मानकर यांची घोषणा

।पुणे।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आजवर २४ तास जनसेवा कार्यालयाच्या माध्यमातून नागरिकांची कामे मार्गी लावण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. पुढील काळात ज्येष्ठ नागरिकांच्या तातडीच्या सेवेसाठी 'फिरते समस्या निवारण कार्यालय' थेट त्यांच्या दारी जाऊन समस्या सोडवेल, अशी घोषणा भाजपचे उमेदवार राघवेंद्र बाप्पु मानकर यांनी केली. प्रभाग क्रमांक २५ मधील प्रचारादरम्यान नागरिकांशी संवाद साधताना त्यांनी हा शब्द दिला.**



महात्मा फुले मंडई परिसरात ज्येष्ठ नागरिकांची संख्या मोठी आहे. त्यांना कोणतीही तातडीची समस्या उद्भवल्यास घरपोच सेवा देण्यासाठी 'फिरते समस्या निवारण कार्यालय' सुरू करण्यात येणार आहे. हेल्पलाईन क्रमांकाद्वारे ड्रेनेज, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य आदी समस्यांची माहिती कार्यालयाला दिल्यास, संबंधित परिसरात तातडीने सोडविण्याचे काम सुरू केले जाईल. समस्या निराकरणास वेळ लागणार असल्यास, प्रत्येक टप्प्यावर नागरिकांना माहिती दिली जाणार आहे. माझ्या २४ तास जनसेवा कार्यालयाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या सेवेचा हा पुढचा टप्पा असेल. नागरिक आम्हाला 'सेवक' म्हणून निवडून देणार आहेत, आणि त्याच भावनेतून त्यांची निस्वार्थ सेवा करण्याचा माझा पक्का निर्धार आहे, असे राघवेंद्र बाप्पु मानकर यांनी सांगितले. ते सध्या घरोघरी नागरिकांशी संवादावर भर देत आहेत. २४ तास जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून हजारो लोकांच्या समस्या सुटल्या आहेत, या नागरिकांचा पाठिंबा मिळत असल्याचे बाप्पु मानकर म्हणाले. दरम्यान, बाप्पु मानकर यांच्यासह स्वरदा बापट, कुणाल टिळक, स्वप्नाली पंडित हे भाजपाचे अधिकृत उमेदवार घरोघरी जाऊन नागरिकांशी संवाद साधत आहेत.

### फिरते समस्या निवारण कार्यालय

कार्यालयाच्या माध्यमातून नागरिकांची कामे मार्गी लावण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. पुढील काळात ज्येष्ठ नागरिकांच्या तातडीच्या सेवेसाठी 'फिरते समस्या निवारण कार्यालय' थेट त्यांच्या दारी जाऊन समस्या सोडवेल, अशी घोषणा भाजपचे उमेदवार राघवेंद्र बाप्पु मानकर यांनी केली. प्रभाग क्रमांक २५ मधील प्रचारादरम्यान नागरिकांशी संवाद साधताना त्यांनी हा शब्द दिला. महात्मा फुले मंडई परिसरात ज्येष्ठ नागरिकांची संख्या मोठी आहे. त्यांना कोणतीही तातडीची समस्या उद्भवल्यास घरपोच सेवा देण्यासाठी 'फिरते समस्या निवारण कार्यालय' सुरू करण्यात येणार आहे

## मिशन- PCMC : निळी आणि लाल पूररेषेची फेरसर्वेक्षण करून

# नव्याने आखणी होणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## कोल्हापूरच्या धर्तीवर नवा डीसीपीआर; महापालिका महाविजयासाठी भाजपाची वज्रमूठ

पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड सहित संपूर्ण महाराष्ट्रमध्ये फेर सर्वेक्षण करून निळी आणि लाल पूरेषा नव्याने आखणी करण्यात येणार आहे. "फ्लड मेटिगेशन मेजर्स"नुसार कोल्हापूरच्या धर्तीवर नवा डीसीपीआर केला जाईल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आकुर्डी येथील सभेत शनिवारी सांगितले.**




पिंपरी चिंचवड शहरातील भारतीय जनता पार्टी आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाच्या अधिकृत उमेदवारांसाठी आकुर्डी विठ्ठल मंदिर येथे शनिवारी (दि १०) मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या उपस्थितीत सभा पार पडली . निवडणूक प्रचार प्रमुख शंकर जगताप, आमदार महेश लांडगे, विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे उमा खापरे ,शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यावेळी उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, निळी आणि लाल पूरेषेचा प्रश्न युनिफाईड डीसीपीआरमुळे निर्माण झाला. यातील काही तरतुदींमुळे तांत्रिक अडचण आली आहे. नदी लगतच्या अनेक भागांमध्ये नवीन डेव्हलपमेंट थांबलेली आहे. निळी आणि लाल पुरेषा हा 100 वर्षांपूर्वीच्या गृहीतकांवर आधारित आहे. त्या वेळच्या पूररेषेच्या मार्किंगनुसार ही रेषा ठरली होती . या संदर्भात अनेक तक्रारी नागरिकांकडून येत आहे.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले कोल्हापूरमध्ये निळ्या आणि लाल पूररेषे संदर्भात नव्याने डीसीपीआर करण्यात आला. या आराखड्यानुसार एखाद्या परिस्थितीमध्ये पूर संभाव्य स्थिती उद्भवली तर कशा पद्धतीचे बांधकाम असले पाहिजे. याबाबत नवीन नियम केले आणि हे नियम लोकांनी स्वीकारले . त्या पद्धतीने बांधकामे केली.

पिंपरी चिंचवडमध्ये ज्या भागात निळी आणि लाल पुररेषा संदर्भात प्रश्न निर्माण झाला आहे. त्यासाठी सॅटेलाइट इमेजचा वापर करून, जीआयओ स्पेशल डेटाचा वापर केला जाणार आहे. "फ्लड मिटीगेशन सिस्टिम"चा वापर केला जात आहे. पुढच्या काळात युनिफाईड डीसीपीआरमध्ये देखील बदल केला जाईल. आणि पिंपरी चिंचवड शहरातील निळी व लाल पुर रेषेसंदर्भातला प्रश्न कायमचा निकालात काढण्यात येईल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिला.

> “ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आजच्या सभेत निळी आणि लाल पूरेषा, प्रॉपर्टी कार्ड, रेड झोन संदर्भात नागरिकांना मोठा दिलासा दिला आहे. वारंवार या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी अधिवेशन, मुख्यमंत्र्यांकडे पत्रव्यवहार करून आपण प्रश्न मांडत आहोत. आज या सभेच्या माध्यमातून नागरिकांना मोठा दिलासा देण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी केले आहे.समस्त पिंपरी चिंचवडकर यासाठी त्यांचे आभारी राहतील.
>
> **–शंकर जगताप,** निवडणूक प्रमुख, आमदार, पिंपरी चिंचवड.

### जीसीसी हबमुळे पिंपरी चिंचवड विकासाच्या केंद्रस्थानी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले यापूर्वी पुणे जिल्हा म्हणजे मॅन्युफॅक्चरिंग, टेक्नॉलॉजीचे हब होता. मात्र आगामी काळात पुणे जिल्हा हा जीसीसी हब म्हणून ओळखला जाणार आहे. भारतातील 25% जीसीसी इन्व्हेस्टमेंट एकट्या पुणे जिल्ह्यात होणार असून, त्यामध्ये पिंपरी चिंचवड केंद्रस्थानी असेल. पुढच्या पाच वर्षात पिंपरी चिंचवड शहराची लोकसंख्या दुपटीने वाढणार आहे. त्याच दृष्टिकोनातून या भागात आपल्याला नियोजन करावे लागणार आहे.म्हणूनच एक विचाराचे सरकार आपल्याला आवश्यक आहे.

---

# मिशन- PMCM : राज्याचे CM फडणवीस यांच्याकडून आ. महेश लांडगे यांची पाठराखण!

## अपना काम बोलता है : पण, 25 वर्षांत काही केले सांगता येत नाही, म्हणून आपल्यावर आरोप

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**"पिंपरी-चिंचवड शहरात 25 वर्षे सत्तेत असताना काय केले? हे सांगता येत नाही. त्यामुळे समोरच्या पक्षातील लोक आपल्यावर आरोप करीत आहेत. त्यामुळे त्रागा- संताप करुन घ्यायचा नाही. "अपना काम बोलता है" आपण केलेली कामे लोकांना सांगायची, जनता आपल्या सोबत आहे. काळजी करु नका, " अशा शब्दांत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार महेश लांडगे यांची पाठराखण केली. आहे.**







पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने भारतीय जनता पार्टी आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी असा तगडा सामना रंगला आहे. आज आकुर्डी येथे मुख्यमंत्री फडणवीस यांची प्रचार सभा झाली. यामध्ये त्यांनी विकासाच्या मुद्यांवर सविस्तर भाष्य केले. गेल्या काही दिवसांपासून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपावर किंबहुना आमदार महेश लांडगे यांच्यावर अनेक आरोप केले. त्यामुळे राजकारण पेटले आणि पिंपरीतील जाहीर सभेत महेश लांडगे यांनी त्यांना जोरदार प्रत्युत्तर दिले. त्याचे पडसाद राज्यभरात उमटले. महेश लांडगे यांनी मुख्यमंत्र्यांसमोर भाषण करताना यावर लक्ष वेधले आणि "महायुतीमधील नेत्यांचा आदर फक्त भाजपाच्या कार्यकर्त्यांच ठेवायचा का?" असा प्रश्न मुख्यमंत्र्यांसमोर उपस्थित केला. सातत्याने आमच्यावर आरोप करुन भाजपाला बदनाम केले जात आहे, याबाबत लक्ष घाला, अशी विनंतीसुद्धा केली.

यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी मार्मिक शब्दांत उत्तर दिले. किंबहुना, महेश लांडगे यांच्यासाठी खास शेर बोलून दाखवला. CM फडणवीस म्हणाले की, "परिंदे को मिलेगी मंजील एक दिन, ये उनके फैरे हुए पंख बोलते है । और वहीं लोग रहतें है खामोश अक्सर जमानें में उनके हुनर बोलते है।" आपलं काम बोलतंय... आणि त्यामुळेच या समोरच्या लोकांचा वैताग आहे. त्रागा आहे. ते रागवले म्हणून तुम्ही रागावू नका. समोरच्या लोकांना सांगायला काम नाही. त्यांना अनेक प्रश्न विचारले जातात. त्याला त्यांच्याकडे उत्तर नाही. त्यामुळे निवडणुकीत वादावादी झाली पाहिजे. सवाल-जवाब झाला पाहिजे, अशी त्यांनी अपेक्षा आहे. आपण केलेले काम सांगितले, तर कुणालाही उत्तर देण्याची वेळ येणार नाही. मागच्यापेक्षा जास्त जागा भाजपाच्या निवडून येतील."

### अजित पवारांवर नाव न घेता टोला

दरम्यान, देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावरही नाव न घेता टोला लगावला. निवडणुका आल्या की, काहींचा कंठ फुटतो, असा टोला देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवार यांना लगावला. तसेच आपलं काम बोलतं. आपल्या कामाबाबत जनतेसला माहिती दिली तर त्यावर समोरचे उत्तर देणार नाहीत. काहींना वाद निर्माण करुन ही निवडणूक लढायची आहे, असं देवेंद्र फडणवीस आपल्या भाषणात म्हणाले.

# या कचऱ्याचं करायचं काय?



## भूमिका

**नुकतीच पुन्हा एकदा त्या अधिकारी मित्राची आठवण आली. जेव्हा ‘स्वच्छ भारत अभियान’ किती यशस्वी झालं त्याचे गोडवे गायले जात होते. राजकारणी मंडळींसाठी स्वच्छ कचरा-स्थळं तयार करून छायाचित्र-संधी (फोटो ऑप्स) उपलब्ध करून दिल्या जात होत्या त्या वेळी या अधिकारी मित्रानं काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले होते. हा अधिकारी ‘आयएएस’ असला तरी मूळचा अभियंता. त्यामुळे मुद्द्याला चोख आणि एकदम तर्कवादी.**

या अधिकारी मित्राला ते उत्तर अपेक्षितच होतं. तो वाट पाहात होता जणू या उत्तराची. त्यानं लगेच पुढचा युक्तिवाद केला: हा कचरा गावाबाहेर टाकणार. पण तरी तो आपल्याच जिल्ह्यात राहील. मग आपण जिल्ह्यातनं हा कचरा उचलायचा आणि जिल्ह्याबाहेर टाकायचा. पण तरी तो काही आपल्या राज्याबाहेर जाणार नाही. म्हणून मग आपण राज्यातला कचरा घ्यायचा आणि राज्याबाहेर कोणत्या तरी स्थळी टाकायचा. असं सगळीच राज्यं करणार. म्हणजे प्रत्येक राज्याबाहेर कुठे ना कुठे कचऱ्याचे ढीग तयार होणार. पण राज्यं झाली तरी आपलीच. त्यामुळे राज्यांतला कचरा होईल दूर. पण तो देशातच राहील. पण मग प्रश्न असा की या देशातल्या कचऱ्याचं आपण करायचं काय? त्याचं काही आपल्याला नाही करता आलं तर स्वच्छ भारत



अभियानाचं काय? इतकं मूलभूत, विचार करायला लावणारं काही ऐकायची सवय नव्हती त्या मंत्री महोदयांना. आणि तसंही स्वतंत्र विचार करून फार काळ लोटला होता त्यांना. हे विचारबिचार करण्यापेक्षा ‘वरनं’ येणाऱ्या आदेशांचं खाली तसंच्या तसं पालन करण्यात शहाणपण आणि आपल्या प्रगतीचं गुपित दडलंय हे ठाऊक होतं त्यांना. त्यामुळे हे प्रश्न त्यांनी झटकून टाकले आणि स्वच्छ भारत अभियान यशाचा बाइट द्यायला सराईत सुहास्य वदनाने ते कॅमेऱ्यास सामोरे गेले. थोड्या दिवसांनी या माझ्या मित्राची त्या खात्यातनं बदली झाली, अशी बातमी आली. असो.तर हा मित्र आता आठवला कारण भर ज्वानीत आलेला आपल्याकडचा महानगरपालिका निवडणूक हंगाम. आपल्याकडे निवडणुका म्हणजे टोणगे गाभण राहू शकतात; हे सिद्ध करून दाखवणारा काळ. महाराष्ट्रात तर आधी नगरपालिका निवडणुका झाल्या. आता महानगरपालिकांच्या होतील पुढच्या आठवड्यात. त्यानंतर जिल्हा परिषदांचा नंबर. सगळा लोकशाहीचा देखावा कसा यथासांग पार पडेल. या देखाव्याची लगबग जोरात सुरू असताना या आठवड्यात एका परदेशी राजनैतिक अधिकाऱ्याचा फोन आला. भेटू यात का, म्हणून. वेळोवेळी अशा अनेकांच्या भेटी होत असतात. त्यामुळे तसं काही वेगळं वाटलं नाही. ठरल्याप्रमाणे आम्ही भेटलो. निवडणुकांत काय वाटतं वगैरे नेहमीचंच सगळं. पण या गप्पा संपता संपता तो सहज म्हणाला, ‘मला एक प्रश्न पडतो.’मला वाटलं आता हा काहीतरी प्रवचन देणार आणि आपल्याला माहिती असलेल्या गोष्टीच पुन्हा ऐकायला लागणार. या कल्पनेनं चेहऱ्यावर जरा कंटाळवाणा भाव आला असणार. त्यालाही लक्षात आलं असावं. तो म्हणाला, ‘तुमच्याकडच्या महापालिका खरं म्हणजे त्यांचा कचरा विकू शकतात. केवढं मोठं गिऱ्हाईक आहे या कचऱ्याला’ मग यावर गप्पा मारता मारता डेन्मार्कचा प्रयोग समोर आला. डेन्मार्क हा नेदरलँडप्रमाणे एक सपाट देश. नेदरलँडपेक्षा जरा बरा. पण नैसर्गिक उंचीचा डोंगर वा टेकडी फक्त ५५० फूट उंचीची. म्हणजे या देशात डोंगरच नाहीत. नेदरलँड हा संपूर्ण देश जसा सायकलवरनं फिरता येतो. कारण उंचीच नाही कुठे, तसं काही प्रमाणात डेन्मार्कचंही. त्यामुळे त्या देशातल्या नागरिकांना स्किइंगसाठी दुसरीकडे कुठे जावं लागतं. त्या देशात अशी मोठी घसरगुंडीची सोयच नाही. मग त्या देशातल्या अभियत्यांनी ठरवलं. असा एक कृत्रिम डोंगर तयार करायचा आणि त्याच्यावरनं घसरगुंडी. तसा त्यांनी केला आणि ही जागा आता मोठी लोकप्रिय झालीये.तर कचऱ्याचा. मुळात डेन्मार्क वगैरे देश हे अतिस्वच्छ. पुरेसा कचराही तयार होत नाही. पण जो काही होतो त्याचं करायचं काय हा प्रश्न. हा कचरा हाच कच्चा माल वापरून त्यापासनं ऊर्जा तयार करायचा. म्हणजे वीज तयार करायची. म्हणून मग त्यासाठी एक भला मोठा डोंगर तयार केला गेला.

## प्रासंगिक »

### अस्मितेचा पक्ष


***दक्षिणी राज्यांना पक्षभेदांच्या पलीकडे अस्मितेची चाड बाळगता येते...***

राजकीय वादाकडे निव्वळ भावनिक दृष्टीने पाहणेच चूकच. याचे साधे कारण असे की भावनांचे मूल्यमापन करता येत नाही. समजा तसे केलेच आणि एखाद्याची भावना कमकुवत वा कमअस्सल असल्याचा निष्कर्ष निघालाच, तरीही त्या निष्कर्षामुळे उलट ती भावना प्रबळ होण्याचा संभव अधिक. तेव्हा वाद काय स्वरूपाचा किंवा कशाबद्दल आहे, वाद कोण घालते आहे यापेक्षाही त्यातल्या दोन्ही बाजूंच्या भूमिका काय आहेत आणि आताच तो उफाळण्याचे कारण काय याकडे आपापल्या भावना दूर ठेवून पाहणे बरे. केरळ आणि कर्नाटक या दोघा दक्षिणी राज्यांदरम्यान भाषेवरून सध्या पेटत असलेल्या वादाबाबत तर मराठी जनांनी थोडे अंतर राखून पाहिल्याखेरीज योग्य भूमिका घेताच येणार नाही. केरळने त्या राज्यात मल्याळम भाषा हीच इयत्ता दहावीपर्यंत पहिली भाषा असेल, असे विधेयक आणले. कर्नाटकने त्यास विरोध केला.

महाराष्ट्रातील नगरपरिषदांच्या निवडणुका झाल्या. सध्या महापालिका निवडणुकांचा धुराळा उडतो आहे. आणि जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका होऊ घातलेल्या आहेत. महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी आपण मताधिकार बजावणार आहोत.

## चला, मताधिकार ‘सजग’पणे बजावूया

निरनिराळे राजकीय पक्ष आणि उमेदवारांकडून प्रचार जोरात सुरू आहे. लोकशाहीचा कणा असलेल्या मतदारावर वेगवेगळ्या मार्गाने त्याच्या उज्वल भवितव्याच्या दाखल्यांचा भडीमार केला जात आहे. एकूणच प्रचारात लाड, लाडकी, लाडिकता अशा लाडीक शब्दांची मोठी चलती आहे. लाडिकपणाचाही आक्रस्ताळा प्रचार कसा असतो हे दिसू लागले आहे. अलीकडे निवडणुका जाहीर होण्यापूर्वी, जाहीर झाल्यानंतर आचारसंहिता सुरू असताना रेवडी वाटपाचे उपक्रम दिसू लागले आहेत. तसेच निवडणुकीमध्ये पैशाचा वारंवार वापर होऊ लागलेला आहे हे सारे चिंताजनक आहे. अर्थात याची केवळ चिंता करून चालणार नाही तर त्यामध्ये बदल करण्याचे उत्तरदायित्व मतदार म्हणून आपणच स्वीकारण्याची गरज आहे. यापूर्वी दिलेली आश्वासनेही न पाळणारे विविध राजकीय पक्ष आहेत तरीही विकास, गॅरंटी हे शब्द सातत्याने वापरले जात आहेत. अशा या सगळ्या भवतालात



मतदार म्हणून प्रत्येकाने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. तसेच काही जण ‘नोटा’चा पर्याय वापरण्याचाही विचार करत आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर मताधिकार बजावणे हे लोकशाहीच्या अनमोल ठेव्याच्या जोपासनेसाठी आणि लोकशाही बलशाली करण्यासाठी आवश्यक असते.त्यामुळे ज्यांना मत देण्याचा अधिकार आहे तो त्या प्रत्येकाने बजावलाच पाहिजे हे लक्षात घेतले पाहिजे.भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव पूर्ण झाल्यानंतर आणि भारतीय राज्यघटनेचा अमृतमहोत्सव सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर विवेकपूर्ण मताधिकार बजावणे आवश्यक आहे. भारतीय राज्यघटनेने आपल्याला अगदी सहजपणे मतदार म्हणून दिलेला अधिकार वापरण्यासाठी आपण किती सजग, सक्षम, विवेकी, प्रामाणिक आहोत हे स्वतःशीच तपासण्याची गरज आहे.सरकार निर्माण करण्यात आणि सरकारवर निमंत्रण ठेवण्यात नागरिकाला सहभागी होता आलं पाहिजे हे लोकशाही पद्धतीत गृहीत धरले आहे. आपले लोकप्रतिनिधी निवडण्यासाठी अधिकार बजावणे हा या सहभागाचा महत्त्वाचा व मूलभूत आविष्कार आहे. मताधिकार म्हणजे सरकार कसे असावे यासंबंधी लोकांनी आपल्या मताद्वारे प्रतिनिधींची निवड करण्यासाठी व्यक्त केलेली इच्छा. अशी इच्छा व्यक्त करणाऱ्या नागरिक म्हणजेच मतदार असतो. लोकशाही आणि लोकांची सार्वभौम सत्ता या आपल्या राष्ट्राच्या पायाभूत संकल्पना प्रत्यक्षात आणण्याचे एक महत्त्वाचे साधन म्हणून आपण मताच्या अधिकाराकडे पाहिले पाहिजे .हा मताधिकार बजावताना आपण जेवढे जागरुक, बळी न पडणारे ठरू तेवढे आपले स्वतःचे व देशाचे हीच सुरक्षित राहील.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

**सत्ताधाऱ्यांना भ्रष्टाचाराचा रोग**

## उद्धव ठाकरे यांनी भाजपावर टीकास्त्र सोडले

# तर तुमचा कुपोषणाने मृत्यू झाला असता

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिवसेना प्रमुखांनी दोन घास भरवले नसते तर तुमचा कुपोषणाने मृत्यू झाला असता. तुम्ही आमच्या पानातील उष्टे खरकटे का खातात. किती खाता, भस्म्या रोग झाला आहे. आमचे किती लोक घेता, आता सत्ताधाऱ्यांचे वस्त्रहरणही करता येणार नाही कारण सत्ताधाऱ्यांनी लाज सोडली आहे, अशा शब्दात उद्धव ठाकरे यांनी भाजपावर टीकास्त्र सोडले.छत्रपती संभाजीनगर महापालिका निवडणुकीमध्ये शिवसेनेकडून उभे करण्यात आलेल्या ९६ उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत उद्धव ठाकरे बोलत होते.**

## दंगल होऊ न दिल्याने औद्योगिक विकास




भाजपचे माजी प्रदेशाध्यक्ष रावसाहेब दानवे यांनी विरोध करणारे सारे जण आमच्या ताटात जेऊन गेले आहेत, अशी टीका केली होती. या संदर्भाने त्यांनी ही टीका केली. निवडणुकीपूर्वी फोन पे वरुन जर पैसे दिले जात असतील. विरोधी पक्षाकडून कोणी उभेच राहू नये असे प्रयत्न केले जात आहे. विरोधी पक्षावर ईडी, आयकर वर छापे टाकत आहेत. अशा स्थितीमध्ये निवडणुका घेतल्या जात असताना सत्ताधाऱ्यांना आव्हान देत आहे.' सत्ताधाऱ्यांना महापालिकेत दिलेले आव्हान पेलणार नाही. त्यांच्याकडे सत्तेचे मस्ती आहे. ज्यांना दिले त्यांनी खाल्ले,माजले. ते गेले आता नवी सुरुवात करू. १९८८ मध्ये जशी सुरू केली तशीच सुरुवात करू. काही नवे चेहरे मिळाले आहेत. पैशांच्या मस्तीने निवडणूक फिरवली जाणार असेल त्याला कोणी भीक घालणार नाही, असेही ठाकरे म्हणाले. ही अस्तित्वाची नाही तर तुमच्या जगण्याची ही लढाई आहे.भाजप विकृत माणसाला तुम्ही स्वीकृत करता. राष्ट्रप्रथम हे सांगणारे भाजप आता मेली आहे. बलात्कार, खूनी चालतात. गुंड प्रथम, भ्रष्टाचारी प्रथम, अशी त्यांची अवस्था आहे. आता त्यांना विचारा कोठे नेऊन ठेवला आहे, महाराष्ट्र माझा, असा सवालही ठाकरे यांनी केला. प्यायला पाणी मिळत नाही पण दारुचे परवाने पटापट मिळत आहेत. कारण सत्ताधारी मंडळी खोटारडी आहेत असेही ते म्हणाले.या वेळी शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, उपनेते सुभाष पाटील यांची समयोचित भाषणे झाली. सभेस मिलिंद नार्वेकर, शहराध्यक्ष बाळासाहेब थोरात आहे.

एमआयएम बरोबर मैत्री करता. १९८८ पासून दंगल होऊ दिली नाही. शांतता राखली गेली त्यामुळे औद्योगिक वाढ झाली. त्याचे श्रेय शिवसेनेचे असल्याचा दावा चंद्रकांत खैरे यांनी केला.

## शिरसाट यांच्यावर टीका

५३ जलकुंभा पैकी फक्त ९ जलकुभ झाले. ४६०० कोटी रुपयाच्या घोटाळयात स्थानिक खासदारांचे नाव होते. इडीची चौकशी आता बंद झाली आहे. संजय शिरसाट यांनी एमआयडीचे भूखंड स्वत: च्या कंपनीला घेतला. खासदारांच्या वाहनचालक २५० कोटीची जमीन घेतली. त्याला अटक झाली. जावेद शेख या वाहन चालकाला बळीचा बकरा बनवला आहे अशी टीका शिवसेना नेते अंबदास दानवे यांनी केले.

खासदारांना मराठी वाचता येत नाही. त्यांनी फक्त दारुची दुकाने उघडली, अशी टीका खैरे यांनी केली.ते आपल्या मुलीचा आणि मुलाचा करतात. बाकी काही करत नाहीत, अशी टीका मंत्री संजय शिरसाट यांचे नाव न घेता या वेळी करण्यात आली. केली. या निवडणुकीमध्ये शिरसाट यांचे चिरंजीव सिद्धांत आणि मुलगी हर्षदा निवडणूक लढवत आहे. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री यांनी अडीच हजार कोटी रुपये मंजूर केले होते. १६८० कोटी रुपयांची योजना ठाकरे यांनी मंजूर केली होती. त्याचा कार्यरंभ आदेश दिले. कंत्राटदार काम करण्यास तयार नव्हते. पण त्याला काम करायला लावले. २०२२ ला १० किलोमीटरचे काम बाकी होते. खोट्या घोषणा केल्या जातात. शहराला नऊ दिवसाला एकदा पाणी मिळते. शिवसेनेत असताना दोन दिवसाला पाणी देत होतो. २३ रस्त्याला १५२ कोटी रुपये दिले होते. चार वर्षात बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक पूर्ण होऊ शकले नाही. सफारी पार्कची मंजुरी ठाकरे यांनी दिली होती. सत्ताधाऱ्यांनी 'सुपर संभाजीनगर' हे भ्रष्टाचाराचा अड्डा बनवला आहे.स्कूल ऑफ आर्किटेक्चर नागपूरला पळवले. पाणी पुरवठा योजना २७६० कोटी रुपयांवर गेली. १०५० कोटी कोणाच्या खिशात जाणार आहात. मुख्यमंत्री खोटे बोलत आहे. ८३२ कोटी रुपयांचे कर्ज महापालिकेला घ्यावे लागणार. हप्ता फेडायला महापालिकेकडे पैसे राहणार नाही.शहरात फक्त ४४ दिवस शहराला पाणी मिळाले आहे.

# भाजपनव्हे तर, बलात्कार जनता पक्ष..!

## हर्षवर्धन सपकाळ यांनी भारतीय जनता पक्षावर घणाघाती टीका केली

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**देशातील अनेक बलात्काराच्या घटनांमध्ये भाजप आमदारच असल्याचे समोर आले आहे. यामुळे देशातील मुलींच्या सुरक्षिततेसाठी भारतीय जनता पक्षापासूनच देशाला वाचवण्याची वेळ आली आहे. म्हणूनच आज भारतीय जनता पक्षाला लोक "बलात्कार जनता पक्ष" असे संबोधत आहेत.**

ज्या पक्षात बलात्काराच्या आरोपींना तिकिट दिले जाते, त्यांच्या पाठीशी उभे राहिले जाते, अशा पक्षाला जनता योग्य उत्तर देईल, असा आरोप काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी शनिवारी ठाण्यात पत्रकारांशी बोलताना केला.ठाणे महापालिका निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाने तयार केलेला जाहीरनामा शनिवारी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला. त्याआधी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टिका करण्याबरोबरच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर गंभीर आरोप केले.

बदलापूरमध्ये एका बलात्काराच्या आरोपीला पक्षात सामावून घेण्याचा प्रकार समोर आला. हे सर्व भारतीय जनता पक्षाच्या कारभाराचा भाग आहे. उत्तराखंडमध्ये एका महिलेवर बलात्कार झाला, त्यातील आरोपी भाजपचा आमदारच होता. दुसऱ्या ठिकाणी झालेल्या बलात्कारातही भाजपचे आमदारच होते. ऑलिम्पिक पदक विजेत्या महिला खेळाडूंचे लैंगिक शोषण करणारा देखील भाजपचा खासदार होता आणि आजही आहे.




अशा परिस्थितीत आता देशातील मुलींच्या सुरक्षिततेसाठी भारतीय जनता पक्षापासूनच देशाला वाचवण्याची वेळ आली आहे. म्हणूनच आज भारतीय जनता पक्षाला लोक "बलात्कार जनता पक्ष" असे संबोधत आहेत, असा आरोप सकपाळ यांनी केला. ज्या पक्षात बलात्काराच्या आरोपींना तिकिट दिले जाते, त्यांच्या पाठीशी उभे राहिले जाते, अशा पक्षाला जनता योग्य उत्तर देईल, असा आरोप त्यांनी केला.आज शिवसेना (शिंदे गट), अजित पवार गट आणि भाजपा यांच्याजवळ मोठ्या प्रमाणावर पैसा आहे. हा पैसा चार मार्गाने त्यांच्याकडे येतो. पहिला मार्ग म्हणजे, शासकीय योजनांमधील भ्रष्टाचार. समृद्धी महामार्गात दोन हजार कोटींचा भ्रष्टाचार झाला. त्यातून आलेल्या पैशावरच "पन्नास खोके एकदम ओके" हा नारा उभा राहिला. हे त्या भ्रष्टाचाराचे विषारी फळ आहे.

## दोन हजार कोटींचा भ्रष्टाचार

दुसरा मार्ग म्हणजे, देवेंद्र फडणवीस हे बदल्यांमधून पैसे घेतात, ते देवा भाऊ नसून टक्का भाऊ तसेच मेवा भाऊ आहेत. तिसरा मार्ग म्हणजे, भूमाफियांमार्फत शासकीय जमिनी विकून पैसे कमावले जातात. त्यासाठीच गुंड आणि खंडणीखोर लोकांना पक्षात घेतले जाते, त्यांना तिकिट दिले जाते आणि तिथून पैसा उभा केला जात आहे.

## दोन्ही देशातील संघर्ष थांबला नाही

## सीमेपलीकडे ड्रोन उडवल्याचा उत्तर कोरियाचा दावा

# कोरिया अन् उत्तर कोरियात तणाव

## व्हेनेझुएला देशावर मोठा हवाई

## रशिया-युक्रेन युद्धाला तीन वर्षे

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जगातील अनेक देशांमध्ये तणावाचं वातावरण आहे. रशिया-युक्रेन युद्धाला जवळपास तीन वर्षे झाले आहेत, पण अद्यापही दोन्ही देशातील संघर्ष थांबलेला नाही. यातच अमेरिकेने व्हेनेझुएला देशावर मोठा हवाई हल्ला करून तेथील राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांना अटक केलं. त्यामुळे जगभरात खळबळ उडाली. असं असतानाच आता दक्षिण कोरिया आणि उत्तर कोरियामध्ये तणाव वाढल्याची माहिती समोर आली आहे.**



दक्षिण कोरियाचे कथित ड्रोन पाडल्याचा दावा उत्तर कोरियाने केला आहे. दक्षिण कोरियाने हवाई हद्दीचं उल्लंघन केल्याचा आरोप उत्तर कोरियाकडून करण्यात आला आहे. शनिवारी उत्तर कोरियाने म्हटलं की, या महिन्याच्या सुरुवातीला दक्षिण कोरियाच्या ड्रोनने त्यांच्या हवाई हद्दीत प्रवेश केला आणि हवाई हद्दीचं उल्लंघन केलं. दरम्यान, उत्तर कोरियाच्या सरकारी मीडियाच्या हवाल्याने रॉयटर्सने हे वृत्त दिलं आहे. वृत्तानुसार, ४ जानेवारी रोजी काही ड्रोन उत्तर कोरियाच्या हवाई हद्दीत घुसले. मात्र, त्यानंतर उत्तर कोरियाच्या सैन्यांनी ते तात्काळ पाडले. हे ड्रोन दक्षिण कोरियाच्या इंचियोन शहराजवळील एका बेटावरून आले होते आणि या ड्रोननी सुमारे ८ किलोमीटर प्रवास केल्याचा आरोप उत्तर कोरियाने केला आहे.या ड्रोनमध्ये पाळत ठेवणारे कॅमेरे होते आणि उत्तर कोरियाच्या प्रमुख सुविधांचं छायाचित्रण करण्यासाठी त्याचा वापर केला जात होता. या ड्रोनचे अवशेष आणि या इलेक्ट्रॉनिक उपकरणातून मिळालेले हवाई छायाचित्रांमधून ही माहिती समोर आली असल्याचा दावा उत्तर कोरियाकडून करण्यात आला आहे.उत्तर कोरियाच्या आरोपानंतर दक्षिण कोरियाच्या लष्कराने हे आरोप फेटाळून लावले आहेत. दक्षिण कोरियाने म्हटलं की, उत्तर कोरियाच्या माध्यमांनी दाखवलेले ड्रोनच्या वृत्तात तथ्य नाही. उत्तर कोरियाने दिलेल्या तारखेला ड्रोन उडवले नाहीत. पण तरी ड्रोन सीमा ओलांडून गेले आहे का? याची चौकशी केली जाईल. “उत्तर कोरियाला चिथावणी देण्याचा आमचा कोणताही हेतू नाही आणि आम्ही तणाव कमी करण्यासाठी आणि विश्वास निर्माण करण्यासाठी व्यावहारिक उपाययोजना आणि

या ड्रोनचे अवशेष आणि या इलेक्ट्रॉनिक उपकरणातून मिळालेले हवाई छायाचित्रांमधून ही माहिती समोर आली असल्याचा दावा उत्तर कोरियाकडून करण्यात आला आहे. उत्तर कोरियाच्या आरोपानंतर दक्षिण कोरियाच्या लष्कराने हे आरोप फेटाळून लावले आहेत. दक्षिण कोरियाने म्हटलं की, उत्तर कोरियाच्या माध्यमांनी दाखवलेले ड्रोनच्या वृत्तात तथ्य नाही.

प्रयत्न करत राहू”, असं दक्षिण कोरियाच्या लष्कराने एका निवेदनात म्हटल्याचं वृत्तात म्हटलं आहे.जगातील अनेक देशांमध्ये तणावाचं वातावरण आहे. रशिया-युक्रेन युद्धाला जवळपास तीन वर्षे झाले आहेत, पण अद्यापही दोन्ही देशातील संघर्ष थांबलेला नाही. यातच अमेरिकेने व्हेनेझुएला देशावर मोठा हवाई हल्ला करून तेथील राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांना अटक केलं. त्यामुळे जगभरात खळबळ उडाली. असं असतानाच आता दक्षिण कोरिया आणि उत्तर कोरियामध्ये तणाव वाढल्याची माहिती समोर आली आहे. दक्षिण कोरियाचे कथित ड्रोन पाडल्याचा दावा उत्तर कोरियाने केला आहे. दक्षिण कोरियाने हवाई हद्दीचं उल्लंघन केल्याचा आरोप उत्तर कोरियाकडून करण्यात आला आहे. शनिवारी उत्तर कोरियाने म्हटलं की, या महिन्याच्या सुरुवातीला दक्षिण कोरियाच्या ड्रोनने त्यांच्या हवाई हद्दीत प्रवेश केला आणि हवाई हद्दीचं उल्लंघन केलं. दरम्यान, उत्तर कोरियाच्या सरकारी मीडियाच्या हवाल्याने रॉयटर्सने हे वृत्त दिलं आहे. मात्र, त्यानंतर उत्तर कोरियाच्या सैन्यांनी ते तात्काळ पाडले. हे ड्रोन दक्षिण कोरियाच्या इंचियोन शहराजवळील एका बेटावरून आले होते आणि या ड्रोननी सुमारे ८ किलोमीटर प्रवास केल्याचा आरोप उत्तर कोरियाने केला आहे.या ड्रोनमध्ये पाळत ठेवणारे कॅमेरे होते आणि उत्तर कोरियाच्या प्रमुख सुविधांचं छायाचित्रण करण्यासाठी त्याचा वापर केला जात होता.

# राम मंदिरात नमाज पठण करण्याचा प्रयत्न

## काश्मिरी व्यक्तीला पोलिसांनी घेतले ताब्यात

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अयोध्येतील रामजन्मभूमी संकुलात एक धक्कादायक सुरक्षा परिस्थिती निर्माण झाली आहे. तीन काश्मिरी तरुणांनी संकुलात नमाज अदा करण्याचा प्रयत्न केल्याची गंभीर घटना समोर आली आहे. सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे त्यांना घटनास्थळीच रोखण्यात आले आणि तात्काळ ताब्यात घेण्यात आले. या घटनेमुळे सुरक्षा यंत्रणांना हाय अलर्टवर ठेवण्यात आले आहे.**

अयोध्येतील राम मंदिरात एका काश्मिरी व्यक्तीने नमाज अदा करण्याचा प्रयत्न केला. या घटनेची माहिती मिळताच पोलीसांनी सुरक्षित वाढ केली. या व्यक्तिने नमाज अदा करण्यासाठी कापड पसरताच, सुरक्षा कर्मचाऱ्यांनी त्याला अटक केली. त्यानंतर तो घोषणाबाजी करू लागला. अनेक सुरक्षा यंत्रणा घटनास्थळी पोहोचल्या. ही घटना शनिवारी (10 जानेवारी) दुपारी २ वाजण्याच्या सुमारास घडली. मिळालेल्या माहितीनुसार राम मंदिरात जमलेल्या भाविकांमध्ये एक काश्मिरी व्यक्ती मंदिर परिसरात घुसला. तो थेट पश्चिमेकडील तटबंदीवर गेला आणि कापड पसरून नमाज अदा करण्याचा प्रयत्न केला.मंदिर परिसरात सुरक्षा



कर्मचाऱ्यांनी त्या व्यक्तीला पाहिले तेव्हा त्यांनी त्याला तातडीने ताब्यात घेतले. अटक केल्यानंतर, तो व्यक्ती एका विशिष्ट समुदायाविरुद्ध घोषणाबाजी करू लागला. सुरक्षा कर्मचाऱ्यांनी ताबडतोब पोलिसांना आणि सर्व एजन्सींना, ज्यामध्ये सीआरपीएफ, एसएसएफ आणि गुप्तचर संस्थांचा समावेश आहे, माहिती दिली.

सर्व एजन्सींचे अधिकारी तात्काळ घटनास्थळी पोहोचले. ताब्यात घेतलेल्या एका व्यक्तीची आता चौकशी सुरू आहे. एसएसपी

## मांसाहारी पदार्थांच्या बंदी

पुरवठ्याबाबत वारंवार तक्रारी आल्यानंतर, अयोध्या प्रशासनाने राम मंदिराच्या १५ किलोमीटरच्या परिघात मांसाहारी पदार्थांच्या पुरवठ्यावर बंदी घातली आहे. अयोध्येतील काही हॉटेल्स आणि होमस्टे पाहुण्यांना मांसाहारी पदार्थ आणि अल्कोहोलिक पेये देत असल्याच्या तक्रारींनंतर, अधिकाऱ्यांनी अशा आस्थापनांना अशा उपक्रमांपासून दूर राहण्याचा कडक इशारा दिला आहे.

डॉ. गौरव ग्रोव्हर यांनी सांगितले की, मंदिर परिसरातून अटक केलेल्या व्यक्तीकडून आधार कार्ड जप्त करण्यात आले आहे. त्याचे नाव अहद शेख असे आहे. तो ५५ वर्षांचा आहे आणि श्रीनगरचा रहिवासी आहे. त्यांनी सांगितले की, सीसीटीव्ही फुटेज मिळवले जात आहे आणि प्रत्येक तपशील तपासला जात आहे. प्राथमिक माहितीनुसार, हा व्यक्ती ५०-५५ वर्षांचा आहे जो तटबंदीजवळ कापड पसरून नमाज पठण करण्याचा प्रयत्न करत होता.नमाज पठण करण्याच्या पद्धतीने बसला. सुरक्षा कर्मचाऱ्यांनी त्याला पकडले आणि चौकशी सुरू आहे. एसपींनी सांगितले की, अहमद शेख नावाचा काश्मिरी हा शोपियान जिल्ह्यातील रहिवासी आहे.

# ‘अ परफेक्ट मर्डर’ नाटकातून हिचकॉकचा जिवंत थ्रिल

हिचकॉक म्हणजे थ्रिलचा राजा! त्यांच्या कलाकृतींमध्ये असलेला गूढपणा, रोमांच आणि भीतीचा सूक्ष्म खेळ नेहमीच मला मोहवतो,” असं अभिनेत्री दिप्ती भागवत सांगतात. त्या लवकरच रंगभूमीवर “अ परफेक्ट मर्डर” या नाटकातून मीरा ही मध्यवर्ती भूमिका साकारणार आहेत — आणि ही भूमिका प्रेक्षकांना रहस्याच्या नव्या जगात घेऊन जाणार आहे. हे नाटक सुप्रसिद्ध चित्रपटकार सर अल्फ्रेड हिचकॉक यांच्या क्लासिक कथानकावर आधारित असून लेखक नीरज शिरवईकर आणि दिग्दर्शक विजय केंकरे यांनी त्याला मराठी रंगभूमीचा साज चढवला आहे. “मूळ कथेचा आत्मा कायम ठेवून, मराठी संवेदनांना साजेसं रूपांतर करणं ही मोठी कसोटी होती — आणि आमच्या टीमने ती उत्कृष्टरीत्या पार पाडली,” असं दिप्ती म्हणतात.दिप्तीची ‘मीरा’ ही एक बहुरंगी व्यक्तिरेखा आहे — श्रीमंती, सौंदर्य आणि आत्मविश्वासाने झगमगणारी, पण अंतर्मनात असंख्य प्रश्न आणि भावनांच्या वादळांनी ढवळलेली. या भूमिकेसाठी त्यांना भावनिक खोली आणि संयम दोन्हीची गरज भासली. “प्रत्येक दृश्य हे प्रेक्षकांशी संवाद साधणारं आहे. काही संवाद शब्दात नाहीत, ते नजरेत आहेत — नाटकातील प्रत्येक थांबा, प्रत्येक शांतता काहीतरी सांगून जाते,” असं त्या सांगतात.

# प्रसिद्ध बॉलीवूड गायकाने गुपचूप उरकलं लग्न

नवीन वर्षाच्या सुरुवातीला प्रसिद्ध बॉलीवूड गायक अरमान मलिक विवाहबंधनात अडकला आहे. अरमानने त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर फोटो शेअर करून ही आनंदाची बातमी चाहत्यांना दिली. अरमानने त्याची गर्लफ्रेंड आशना श्रॉफशी लग्न केलं आहे. मागील बऱ्याच वर्षांपासून अरमान व आशना रिलेशनशिपमध्ये होते. अखेर दोघांनी लग्नगाठ बांधली असून आयुष्यातील नवीन प्रवासाला सुरुवात केली आहे. ‘मैं रहूँ या ना रहूँ’, ‘जेहर’, ‘बोल दो ना जरा’, ‘पहेला प्यार’, ‘मुझको बरसात बना लो’ अशा अनेक लोकप्रिय गाण्यांचा गायक अरमान मलिकने आयुष्यातील नवीन इनिंग सुरू केली आहे. अरमानने त्याची गर्लफ्रेंड आता पती-पत्नी झाले आहेत. अरमानने इन्स्टाग्रामवर लग्नातील फोटो पोस्ट केले आहेत. ‘तू है मेरा घर’ असं कॅप्शन अरमानने या फोटोंना दिलं आहे.अरमान मलिकने पत्नी आशनाला टॅग करत लग्नाचे ६ फोटो शेअर केले आहेत, ज्यामध्ये ते दोघेही लग्नाचे विधी पूर्ण करताना दिसत आहेत. अरमान व आशना यांच्या लग्नातील लूकची खूप चर्चा होत आहे. आशना केशरी रंगाचा लेहेंग्यात खूप सुंदर दिसत आहे, तर अरमानने फिकट गुलाबी रंगाची शेरवानी घातली आहे, दोघेही एकत्र खूप क्यूट दिसत आहेत.

# अफेअरच्या चर्चांबद्दल त्रास

बॉलीवूड अभिनेता आमिर खान (AAMIR KHAN) त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे अनेक कारणाने चर्चेत राहत असतो. अशातच नुकतंच त्याने त्याच्या ६० व्या वाढदिवसानिमित्त नवीन नात्याची घोषणा केली. २५ वर्षांपासूनची मैत्रीण असलेल्या गौरीबरोबर रिलेशनमध्ये असल्याचं आमिरने सांगितलं. गौरीबरोबर आमिरचे हे तिसरे रिलेशनशिप असून याआधी त्याची दोन लग्न झाली आहेत. त्याने पहिलं लग्न रीना दत्ताशी केलं होतं. या दोघांना आयरा आणि जुनैद ही मुलं आहेत. लग्नाच्या १५ वर्षांनंतर त्यांनी घटस्फोट घेतला. त्यानंतर आमिरने किरण रावशी दुसरं लग्न केलं. किरण रावसोबतही आमिरचा संसार १५ वर्षे टिकला. यादरम्यान, आमिरचे नावं इतरही काही अभिनेत्रींबरोबर जोडली गेली होती. किरण रावला घटस्फोट दिल्यानंतर आमिर आणि ‘दंगल’ फेम अभिनेत्री फातिमा सना शेख (FATIMA SANA SHAIKH) यांच्या अफेअरच्या चर्चा रंगल्या होत्या. किंबहुना फातिमामुळेच आमिरने किरणला घटस्फोट दिल्याचं म्हटलं गेलं होतं. याबद्दल आता स्वत: फातिमाने भाष्य केलं आहे. नुकत्याच एका मुलाखतीत अभिनेत्रीने या अफेअरच्या चर्चांबद्दल सांगितलं. फिल्मफेअरशी संवाद साधताना फातिमाला आमिर खानबरोबरच्या अफेअरच्या चर्चांबद्दल विचारण्यात आले. यावेळी अभिनेत्रीने उत्तर डेट म्हणाले की, “मला याचा त्रास व्हायचा कारण यापूर्वी अशा गोष्टींचा कधी सामना केलेला नाही. काही अनोळखी लोक आहेत, ज्यांना मी कधीही भेटलेही नाही, ते माझ्याबद्दल काहीतरी लिहीत आहेत. त्या लोकांना यात काही तथ्य आहे .



# ‘मी टू’ प्रकरणात झालेले आरोप

दिग्दर्शक साजिद खान २०१८ मध्ये ‘हाउसफुल ४’चे शूटिंग करताना त्याच्यावर अनेक महिलांनी #METOO मोहिमेंतर्गत लैंगिक शोषणाचे आरोप केले होते. या आरोपांमुळे त्याचे जीवन पूर्णतः बदलून गेले. तब्बल सहा वर्षे त्याने याबाबत मौन बाळगले. अलीकडेच त्याने एका मुलाखतीत या संदर्भात वक्तव्य केले आहे. साजिद खानने ‘हिंदुस्तान टाइम्स’ला दिलेल्या मुलाखतीत गेल्या सहा वर्षांच्या काळाबद्दल सांगितले. साजिद म्हणाला, “या सहा वर्षांत अनेक वेळा स्वतःला संपवण्याचे विचार माझ्या मनात आले. भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी दिग्दर्शक संघटनेनं (IFTDA) परवानगी दिल्यानंतरही मला काम मिळालं नाही. या काळात कमाई नसल्यानं मला माझं घर विकावं लागलं आणि भाड्याच्या फ्लॅटमध्ये राहावं लागलं.”साजिद म्हणाला, “करिअरच्या सुरुवातीच्या काळात, मी केवळ चर्चेत राहण्यासाठी खळबळजनक गोष्टी बोलत असे. जेव्हा मी टीव्हीवर काम करीत होतो, तेव्हा माझं काम लोकांचं मनोरंजन करणं होतं. पण, माझ्या काही वक्तव्यांनी मी अनेक लोकांना नाराज केलं. आज मी माझ्या काही जुन्या मुलाखती पाहतो, तेव्हा मला वाटतं की मी टाईम मशीन घेऊन जाऊन स्वतःला थांबवावं आणि सांगावं, ‘अरे मूर्खा, तू काय बोलतो आहेस?. जेव्हा माझ्या वक्तव्यांनी लोकांची मनं दुखावली जात आहेत याची मला जाणीव झाली, तेव्हा मी त्यांची माफी मागितली.”साजिद पुढे म्हणाला, “जेव्हा तुमच्याकडे काम नसतं, तेव्हा तुम्ही तुमच्या जीवनाबद्दल विचार करू लागता. आता मी शांत झालो आहे. आता मी केवळ कामावर लक्ष केंद्रित करू इच्छितो.”

# कंगनाला आलं एक लाख वीज बिल

बॉलीवूड अभिनेत्री आणि हिमाचल प्रदेशच्या मंडीची खासदार कंगना रणौतने कायमच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत राहत असते. ती अनेकदा राजकीय व मनोरंजन क्षेत्राशी संबंधित विषयांवर भाष्य करत असते. अशातच कंगणा एका विशेष कारणाने चर्चेत आली आहे आणि हे कारण म्हणजे तिला आलेलं विजेचं बिल. वीज बिलाचा मोठा झटका लागला आहे. याविरोधात तिने काँग्रेसच्या नेतृत्वाखालील हिमाचल प्रदेश सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. हिमाचल प्रदेशमधील मंडी इथं नुकत्याच झालेल्या एका राजकीय कार्यक्रमादरम्यान कंगना यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली. यावेळी तिने तिच्या मनालीमधील घराचं वीज बिल एक लाख रुपये आल्याचं सांगितलं आहे. कंगनाचं मुंबईशिवाय मनालीमध्येही एक घर आहे आणि तिच्या याचं घराचं वीज बिल लाख रुपये झाल्याने कंगणाला मोठा धक्का धक्का बसला आहे. विशेष म्हणजे या घरात कंगना क्वचितच राहत असल्याचे तिने स्वत: सांगितलं आहे. मंगळवारी मंडीमधील बल्ह विधानसभा क्षेत्रातील लोकांना संबोधित करताना कंगना म्हणाली की, “या महिन्यात माझ्या मनालीतील घराचं विजेचं बिल १ लाख रुपये आलं. या घरात मी राहतही नाही. इतकी दुर्दशा केलेली आहे. शरम वाटते की हे काय होत आहे. हिमाचल प्रदेशची अवस्था पाहणे वेदनादायक आहे.”यापुढे तिने म्हटलं आहे की, “आपल्याकडे एक संधी आहे. तुम्ही सर्वजण जे मला माझ्या भावाबहिणींसारखे आहेत, तुम्ही ग्राऊंड लेव्हलला इतकं काम करता. आपलं दायित्व आहे की, आपल्याला या देशाला, या प्रदेशाला प्रगतीच्या मार्गावर घेऊन जायचंय. मी तर म्हणेन की, हे सर्वजण लांडगे आहेत आणि आपल्याला त्यांच्या तावडीतून बाहेर पडायचं आहे.” तिच्या या विधानाची सध्या सर्वत्र चर्चा होत आहे.कंगणा मनोरंजन क्षेत्रासह राजकीय क्षेत्रातही बरीच सक्रीय असते. २०२४ मध्ये तिने राजकारणात प्रवेश केला. हिमाचल प्रदेशातील मंडी या मतदारसंघातून निवडणूक लढवली होती आणि तिथे तिचा विजय झाला होता. कंगणाने भाजपकडून ही निवडणूक लढवली होती. तर अभिनेत्रीचा नुकताच ‘इमर्जन्सी’ चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. यात तिने इंदिरा गांधी यांची भूमिका साकारली होती. दरम्यान, कंगणाच्या ‘इमर्जन्सी’ चित्रपटाला प्रेक्षकांकडून संमिश्र प्रतिसाद मिळाला होता. यानंतर आता ती अभिनेता आर. माधवनबरोबरच्या आगामी चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. त्यामुळे तिच्या या चित्रपटाची सर्वांना उत्सुकता लागून राहिली आहे.



## मुंबईने उडवला दिल्लीचा धुव्वा! जेमिमाहच्या संघाचा केला 50 धावांनी पराभव

# डीवाय पाटीलवर ब्रंट-कौरचे वादळ!

## स्मृती मंधानाच्या टीमची कमाल

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**महिला प्रीमियर लीग २०२६ चा तिसरा सामना शनिवारी नवी मुंबईत मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात खेळला गेला. नवी मुंबईतील डॉ. डीवाय पाटील स्टेडियमवर खेळवण्यात आलेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सने दिल्ली कॅपिटल्सचा ५० धावांनी पराभव करत या हंगामात विजयाचे खाते उघडले. नाणेफेक गमावणाऱ्या मुंबईने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ४ गडी गमावून १९५ धावा उभ्या केल्या. धावांचा पाठलाग करताना दिल्लीचा संघ दबावाखाली गडगडला आणि त्यांना १४५ धावांवर सर्वबाद झाला.**



मुंबईने दिलेल्या १९५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या दिल्ली कॅपिटल्सची सुरुवात खूपच वाईट झाली. दिल्लीचा निम्मा संघ ५० धावांच्या आतच माघारी गेला होता. दिल्लीच्या चिनेल हेन्री वगळता एकही फलंदाज मैदानावर तग धरू शकला नाही. चिनेल हेन्रीने ३३ चेंडूत ५६ धावा केल्या. यामध्ये तिने ५ चौकार आणि ३ षटकार लगावले. शफाली वर्मा ८, लिझेल ली १०, लॉरा वोल्वार्ड ९, जेमिमाह रॉड्रिग्स १, मारिझान कॅप १०, निकी प्रसाद १२, स्नेह राणा ११, मिन्नू मणी ७, नंदनी शर्मा ० धावा करून बाद झाले तर श्री चरणी १० धावांवर नाबाद राहिली. मुंबईकडून निकोला केरी आणि अमेलिया केर यांनी प्रत्येकी ३ विकेट्स घेतल्या आणि नॅट सायव्हर-ब्रंटने २ विकेट्स तर शबनीम इस्माईल आणि संस्कृती गुप्ता यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.

महिला प्रीमियर लीग २०२६ च्या या हंगामातील तिसऱ्या सामन्यात आज शनिवारी मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स आमनेसामने आले आहेत.

नवी मुंबईतील डॉ. डीवाय पाटील स्टेडियमवर खेळवण्यात येत असलेल्या या सामन्यात नाणेफेक गमावणाऱ्या मुंबई इंडियन्सने नॅट सायव्हर-ब्रंट आणि हरमनप्रीत कौरच्या शानदार अर्धशतकांच्या जोरावर ४ बाद १९५ धावा उभ्या केल्या आहेत. दिल्लीला विजयी सुरुवात करायची असेल तर १९६ धावांचा टप्पा गाठावा लागणार आहे. दिल्ली कॅपिटल्सकडून नंदनी शर्मने २ विकेट्स घेतल्या. नवी मुंबईतील डॉ. डीवाय पाटील स्टेडियमवर खेळवण्यात येणाऱ्या या सामन्यात दिल्लीची कर्णधार जेमिमाह रॉड्रिग्सने टॉस जिंकून प्रथम गोलंदाजी करत मुंबईला प्रथम फलंदाजी करण्यासाठी पाचारण केले. मागील सामना गमावणाऱ्या मुंबई संघाची सुरुवात या सामन्यात देखील खराबच राहिली. मुंबईची सलामी जोडी अमेलिया केर आणि जी कमलिनी

## मुंबईने विजयाचे खाते उघडले

नाणेफेक गमावणाऱ्या मुंबईने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ४ गडी गमावून १९५ धावा उभ्या केल्या. धावांचा पाठलाग करताना दिल्लीचा संघ दबावाखाली गडगडला आणि त्यांना १४५ धावांवर सर्वबाद झाला. मुंबईने दिलेल्या १९५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या दिल्ली कॅपिटल्सची सुरुवात खूपच वाईट झाली. दिल्लीचा निम्मा संघ ५० धावांच्या आतच माघारी गेला होता. दिल्लीच्या चिनेल हेन्री वगळता एकही फलंदाज मैदानावर तग धरू शकला नाही.

केवळ १ धावच जोडू शकले. अमेलिया केर भोपळा न फोडताच पव्हेलियनमध्ये परतली. तिला चिनेल हेन्रीने बाद केले. त्यानंतर १६ धावा करून जी कमलिनीही माघारी परतली. वन डाउनला आलेली नॅट सायव्हर-ब्रंटने मागील सामन्याची कमी भरून काढत शानदार फलंदाजी केली.

तिने कर्णधार हरमनप्रीत कौरसोबत ६६ धावांची भागीदारी केली. सायव्हर-ब्रंटने आपले अर्धशतक पूर्ण केले आणि त्यानंतर २० धावा जोडून ती बाद झाली. तिने ४६ चेंडूत ७० धावा केल्या. यामध्ये तिने १३ चौकार लगावले. सायव्हर-ब्रंटनंतर सारी सूत्रे कौरने आपल्या हातात गहटले आणि अर्धशतक ठोकले. तिने निकोला केरीसोबत संघाचा डाव पुढे नेला. निकोला केरी १२ चेंडूत २१ धावा करून ती बाद झाली. कर्णधार हरमनप्रीत कौर ४२ चेंडूत नाबाद ७४ धावा केल्या. तिने या खेळीत ८ चौकार आणि ३ षटकार ठोकले. तर सजीवन सजना ५ धावांवर नाबाद राहिली. दिल्लीकडून नंदनी शर्माने सर्वाधिक २ तर श्री चरणी आणि चिनेल हेन्री यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली. दिल्लीला विजय मिळवायचा असेल तर १९६ धावा कराव्या लागणार आहेत.महिला प्रीमियर लीग २०२६ चा तिसरा सामना शनिवारी नवी मुंबईत मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात खेळला गेला. नवी मुंबईतील डॉ. डीवाय पाटील स्टेडियमवर खेळवण्यात आलेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सने दिल्ली कॅपिटल्सचा ५० धावांनी पराभव करत या हंगामात विजयाचे खाते उघडले.

# सुनील गावस्कर यांनी केली वचनपूर्ती!

## स्टार महिला फलंदाज जेमिमा रॉड्रिग्जला एक खास भेट दिली

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारताचे माजी दिग्गज फलंदाज सुनील गावस्कर यांनी स्टार महिला फलंदाज जेमिमा रॉड्रिग्जला वचन दिले होते ते आता त्यांनी पूर्ण केले आहे. २५ वर्षीय रॉड्रिग्ज या खेळाडूच्या उत्कृष्ट कामगिरीचे कौतुक करण्यासाठी त्यांनी एक गाणे गायले आणि तिला शानदार अशी भेट देखील दिली आहे.**



माजी दिग्गज फलंदाज सुनील गावस्कर यांनी भारतीय महिला क्रिकेट संघाची स्टार खेळाडू जेमिमा रॉड्रिग्जला गिटार भेट दिली आहे.सुनील गावस्कर यांच्याकडून रॉड्रिग्जला वचन देण्यात आले होते की, जर भारतीय महिला संघाने प्रतिष्ठित आयसीसी विश्वचषक जेतेपद जिंकले तर ते तिच्यासोबत एक गाणे गातील. आता त्यांनी या वाचनाची पूर्ती एक खास भेट देऊन केली आहे. सुनील गावस्कर यांनी रॉड्रिग्जला बॅटच्या आकाराचा गिटार देखील भेट दिला आहे.सुनील गावस्कर यांनी शुक्रवारी जेमिमा रॉड्रिग्जला बॅटच्या आकाराचा गिटार भेट दिला. जेव्हा जेमिमाकडून भेटवस्तू उघडण्यात आली.

## या वाचनाची कहाणी काय?

गावस्कर यांनी जेमिमाला बॅटच्या आकाराचा गिटार भेट दिल्याने त्याची चर्चा होताना दिसत आहे. ही कहाणी आयसीसी महिला विश्वचषक २०२५ शी संबंधित आहे. जेमिमा रॉड्रिग्जने सेमीफायनलमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध एक ऐतिहासिक शतक झळकावून भारताला विक्रमी विजय मिळवून देण्यात मोठी भूमिका बजावली होती.

तेव्हा तिने खूप आनंद व्यक्त केला. तिने बॅटच्या आकाराच्या गिटारच्या कारागिरीचे कौतुक देखील केले.

यावेळी गावस्कर आणि जेमीमा या दोघांनी एकत्र "ये दोस्ती" हे गाणे देखील गायले. याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.जेमिमाने आपल्या इंस्टाग्राम खात्यावर लिहिले की, "सुनील सरांनी त्यांचे वचन पाळले आणि आम्ही आतापर्यंतच्या सर्वात छान बॅटने धमाल केली. ते एक खास होते." सुनील गावस्कर आणि जेमिमा हे दोघे देखील संगीत प्रेमी आहेत. जेमिमा अनेकदा गाताना दिसत असते.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। रविवार ।
दि. 11 जानेवारी 2026

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## किवळे, रावेत व परिसरात प्रचार दौरा

# “मी बोलायला नाही, तर तुमचं ऐकायला आले” : आशा भोंडवे

### मिशन–PCMC : प्रभाग 16 मध्ये राष्ट्रवादीच्या प्रचाराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद





। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्र. १६ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (अजितदादा गट) अधिकृत उमेदवार आशा भोंडवे यांच्या प्रचाराला मोठा प्रतिसाद मिळत आहे. महिला सक्षमीकरण, रोजगारनिर्मिती आणि लोकांच्या थेट सहभागावर आधारित प्रचारामुळे नागरिकांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.**

किवळे, रावेत व परिसरातील प्रचार दौऱ्यादरम्यान आशा भोंडवे यांनी ज्येष्ठ नागरिक, महिला मंडळे आणि तरुणांशी थेट संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. विकासनगर परिसरात नागरिकांशी संवाद साधताना त्या म्हणाल्या, “मी बोलायला नाही, तर तुमचं ऐकायला आले आहे. तुमच्या अडचणी समजून घेऊन त्यावर उपाय करणे हेच माझे उद्दिष्ट आहे.” त्यांच्या या भूमिकेला नागरिकांकडून दाद मिळताना दिसली.

**महिला सक्षमीकरण व रोजगारावर भर**

प्रचारात बोलताना आशा भोंडवे यांनी महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाचा मुद्दा केंद्रस्थानी ठेवला. बचत गटांच्या माध्यमातून घराघरात लघुउद्योग सुरू करून महिलांच्या हाताला काम देण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले. “महिला सक्षम झाल्या तर कुटुंब आणि समाज दोन्ही सक्षम होतात,” असे त्यांनी स्पष्ट केले. आशा फाउंडेशनच्या माध्यमातून रोजगार संधी निर्माण करताना महिला सुरक्षेलाही प्राधान्य दिले जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

**विकासाच्या मुद्द्यावर निवडणूक**

गेल्या पाच वर्षांतील सत्ताधाऱ्यांच्या कामगिरीवर भाष्य करत आशा भोंडवे म्हणाल्या की, ही निवडणूक केवळ विकासाच्या मुद्द्यावरच होणार आहे. “पूर्वीच्या लोकप्रतिनिधींनी काय काम केले, हे आता जनतेला स्पष्ट झाले आहे. मी केवळ मत मागायला नाही, तर प्रभागाच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी घ्यायला उभी आहे,” असे त्यांनी सांगितले.

**तरुण व ज्येष्ठांसाठी विशेष योजना**

तरुणांसाठी करिअर मार्गदर्शन व रोजगार संधी, तर ज्येष्ठ नागरिकांसाठी शासकीय योजनांचा लाभ थेट घरापर्यंत पोहोचवण्याचे आश्वासन त्यांनी दिले. भोंडवे परिवाराच्या सामाजिक कार्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये त्यांच्याविषयी विश्वासाचे वातावरण आहे.

## नागरिकांचा विश्वास

स्थानिक नागरिक विठ्ठलराव जगताप म्हणाले, “आशाताई केवळ निवडणुकीपुरत्या दिसत नाहीत. त्या नेहमीच लोकांच्या सुख-दुःखात सहभागी होतात. त्यामुळे यावेळी आम्ही त्यांनाच पाठिंबा देणार आहोत.” महिला सक्षमीकरण, रोजगार आणि लोकसंवादाच्या जोरावर प्रभाग १६ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रचाराला दिवसेंदिवस बळ मिळत असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसत आहे.

## मिशन- PCMC : प्रभाग क्रमांक 4

# दिघी-बोपखेलमध्ये भाजप उमेदवारांचा जोरदार प्रचार

## विकासाच्या मुद्यावर मतदारांना आवाहन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**पिंपरी-चिंचवड : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ४ (दिघी–बोपखेल) येथे भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांच्या समर्थनार्थ जोरदार प्रचार मोहिम पार पडली. या प्रचारात सुमारे ३०० कार्यकर्ते, पदाधिकारी व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

भाजपचे अधिकृत उमेदवार श्रुती विकास डोळस, कृष्णा भिकाजी सुरकुले, हिरानानी गोवर्धन घुले आणि उदय दत्तात्रय गायकवाड यांच्या समर्थनार्थ हा प्रचार राबविण्यात आला. प्रचाराची सुरुवात गणेशनगर कॉलनी क्रमांक १६ व १७ आणि हरी ओम ज्येष्ठ नागरिक संघ, बोपखेल येथून करण्यात आली. उमेदवारांनी कार्यकर्त्यांसह परिसरात फेरफटका मारून घराघरांत जाऊन थेट मतदारांशी संवाद साधला. नागरिकांच्या समस्या ऐकल्या, परिसरातील विकासकामांची माहिती दिली तसेच भविष्यातील योजनांबाबत मार्गदर्शन केले.

नागरिकांनी पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, आरोग्य सुविधा आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी सोयीसुविधा यांसारख्या मुद्द्यांवर चर्चा केली. उमेदवारांनी निवडणुकीत यश मिळाल्यास प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहण्याचे आश्वासन दिले. हरी ओम ज्येष्ठ नागरिक संघाच्या संवादात ज्येष्ठ नागरिकांनी सुरक्षितता, आरोग्य सुविधा आणि सामाजिक उपक्रमांसाठी आवश्यक पाठबळ देण्याचे अपेक्षांचे मुद्दे मांडले. यावर उमेदवारांनी त्यांना पूर्ण सहकार्याचे आश्वासन दिले. प्रचारादरम्यान कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाची लाट पहायला मिळाली. भाजप उमेदवारांना बोपखेल परिसरातून वाढत चाललेला प्रतिसाद पाहून कार्यकर्त्यांनी निवडणुकीत मोठ्या जनसमर्थनाची अपेक्षा व्यक्त केली.

> “प्रभाग क्रमांक ४ च्या प्रत्येक नागरिकाच्या गरजा आमच्यासाठी प्राधान्य आहेत. निवडून आल्यास आम्ही बोपखेल परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहणार आहोत आणि पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, आरोग्य सुविधा तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी सोयीसुविधा सुनिश्चित करू.
>
> **–उदय दत्तात्रय गायकवाड,** उमेदवार, भाजपा, प्रभाग- 4.

---

## प्रभाग क्रमांक ३ मधील “विकास आमचा ध्यास”, “जनता आमचा विश्वास”

## मिशन–PCMC : नितीनआप्पा काळजे यांचे मतदारांना आवाहन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**पिंपरी-चिंचवड | चऱ्होली बु. प्रभाग क्रमांक ३ मध्ये भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचार रॅलीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रचाराच्या तिसऱ्या टप्प्यात महायुतीच्या उमेदवारांनी प्रभागातील निवडणूक रणांगणात आघाडी घेतल्याचे चित्र दिसून आले.**

मोशी येथील जांभुळकर वस्ती, आदर्शनगर, शिवाजीवाडी आणि सभोवतालच्या परिसरात उमेदवारांचे आगमन होताच ढोल-ताशांचा गजर, फटाक्यांची आतषबाजी आणि महिला भगिनींकडून औक्षण करून उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

प्रचार रॅलीची सुरुवात मा. महापौर व उमेदवार मा. नितीनआप्पा काळजे, श्री. सचिनभाऊ तापकीर, सौ. अर्चनाताई सस्ते आणि सौ. सारिका गायकवाड यांनी केली. नागरिकांनी मागील दहा वर्षांतील विकासकामांचे कौतुक केले आणि प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या प्रयत्नांचा उलगडा झाला.

भोसरी विधानसभेचे आमदार श्री. महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली हा विकास कार्यान्वित झाला असून, नागरिकांनी महापौर मा. नितीनआप्पा काळजे यांना मतपेटीतून भरभरून प्रेम दिले. आता संधी हॅट्रिक करण्याची असून, नागरिकांनी चारही उमेदवारांना मतदान करून यशस्वी करण्याचा आवाहन मा. नितीनआप्पा काळजे यांनी केले.

प्रचार रॅलीत भाजपचे माजी नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने नागरिक व महिला भगिनी उपस्थित होते. नागरिकांनी येत्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या चारही उमेदवारांवर विजयाचा ठाम विश्वास व्यक्त केला.

## पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपच्या भव्य सभेत

# आमदार गोरखे यांनी मांडले विकास व्हिजन!

### “ थीम पार्कपासून स्मार्ट सिटी योजना पर्यंत – पीसीएमसीचा सर्वांगीण विकास आमच्या प्राधान्यक्रमात

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज




**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आकुर्डी येथे भव्य सभा पार पडली, ज्यामध्ये महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. सभेत बोलताना आमदार अमित गोरखे यांनी विरोधकांचा जोरदार समाचार घेतला आणि भारतीय जनता पक्षाचा पिंपरी-चिंचवडसाठीचा स्पष्ट विकास दृष्टीकोन उपस्थितांसमोर मांडला.**

आमदार गोरखे म्हणाले की, संत तुकाराम महाराजांच्या पालखीचा पहिला मुक्काम असलेल्या पवित्र स्थळी जीवन व विचारांवर आधारित भव्य थीम पार्क उभारण्याचा संकल्प भाजप सरकारने केला आहे. हा प्रकल्प धार्मिक तसेच सांस्कृतिक आणि पर्यटनदृष्टीने महत्वाचा ठरेल. त्यांनी पीएमआरडीएचा अन्यायकारक डीपी आराखडा रद्द करण्याचा ऐतिहासिक निर्णय फडणवीस सरकारने घेतल्याचे सांगितले. आकुर्डीकरांचा गेली १०–१५ वर्षे प्रलंबित साडेबारा टक्के (१२.५%) परताव्याचा प्रश्न माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मार्गी लावला, ज्यामुळे हजारो नागरिकांना दिलासा मिळाला.

**आमदार गोरखे यांनी शहराच्या विकासासाठी केलेल्या प्रमुख कामांची माहितीही दिली:**

1. मेट्रो प्रकल्प निगडीपर्यंत नेण्याची तरतूद
2. १८० कोटींच्या पोलीस उपायुक्त कार्यालयाचा प्रकल्प मंजूर
3. वायसीएम रुग्णालयाला पीजी इन्स्टिट्यूट दर्जा
4. महाराष्ट्रातील एकमेव दिव्यांग भवन सुरू
5. दिव्यांगांसाठी २००० रुपये मासिक पेन्शन योजना

महावितरणचे अत्याधुनिक संगणकीय कार्यालय पिंपरी-चिंचवडमध्ये त्यांनी प्रधानमंत्री आवास योजना, झोपडपट्टी पुनर्वसन, स्मार्ट सिटी अंतर्गत विकासकामे, रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य व नागरी सुविधांद्वारे शहराचा सर्वांगीण विकास साधल्याचे स्पष्ट केले. पाण्याच्या समस्येबाबत त्यांनी भामा आसखेड प्रकल्प अंतिम टप्प्यात असल्याचे सांगितले, ज्यामुळे लवकरच दीर्घकालीन पाण्याची गरज पूर्ण होईल.

गोरखे यांनी “एक शहर – एक मतदानसंघ” संकल्पनेद्वारे सुशासन, पारदर्शक प्रशासन आणि नागरिकांचा थेट सहभाग हा भाजपचा मुख्य उद्दिष्ट असल्याचे सांगितले.

त्यांनी शिवनेरी जिल्हा व सरकारी कार्यालयांचे विकेंद्रीकरण, एकात्मिक प्रशासकीय केंद्र, स्वतंत्र टास्क फोर्स, स्मार्ट सिटी प्रशासन,

> **“आम्ही फक्त रस्ते आणि इमारती नव्हे, तर पिंपरी-चिंचवडच्या प्रत्येक नागरिकाचे जीवनमान सुधारण्यावर लक्ष केंद्रित करतो. प्रत्येक नागरिकाला विकासाचा लाभ मिळावा, हा आमचा संकल्प आहे.”**
> **–अमित गोरखे, आमदार, विधान परिषद.**

स्मार्ट फॅमिली ॲप, तसेच आरोग्य व स्वच्छतेवर विशेष भर देऊन शहराला आधुनिक आणि सक्षम बनवण्याचा संकल्प व्यक्त केला.

सभेअखेरीस विरोधकांवर टीका करताना त्यांनी विचारले, “२०१४ पूर्वी एवढा विकास का झाला नाही? आज दिसणारा विकास फडणवीस सरकारच्या धाडसी नेतृत्वामुळेच संभव झाला आहे.” सभेला चिंचवडचे आमदार शंकर शेठ जगताप, भोसरीचे आमदार महेश दादा लांडगे, विधान परिषद सदस्य उमाताई खापरे, शहराध्यक्ष शत्रुघ्न बापू काटे, राजेश पिल्ले, राजू दुर्गे आणि मोठ्या संख्येने नागरिक, कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत पिंपरीगाव संवेदनशील जाहीर करा

### प्रभाग क्रमांक 21 – राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना धमकावण्याचे प्रकार

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीतील पिंपरी गाव प्रभाग क्रमांक 21 संवेदनशील प्रभाग म्हणून जाहीर करावा अशी मागणी प्रभाग क्रमांक 21 मधील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार संदीप वाघेरे यांच्या सह डब्बू आसवानी, निकिता कदम, प्रियांका कुदळे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी तसेच पोलीस आयुक्तांकडे केली आहे.**



निवडणूक निर्णय अधिकारी व पोलीस आयुक्तांना दिलेल्या पत्रात संदीप वाघेरे यांनी प्रभागातील सद्यस्थितीबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक २१ मध्ये सामाजिक तणाव निर्माण होण्याची शक्यता असून, कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने काही संवेदनशील घटना घडत असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. विशेषतः मतदारांना विविध प्रकारची प्रलोभने दाखवली जात असल्याचे तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना धमकावण्याचे प्रकार घडत असल्याचे निदर्शनास येत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. पत्रात पुढे म्हटले आहे की, या प्रकारांमुळे प्रभागातील वातावरण तणावपूर्ण बनत असून, आगामी काळात अनुचित घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे निवडणूक प्रक्रिया शांततेत, निर्भय वातावरणात आणि लोकशाही मूल्यांना अनुसरून पार पाडण्यासाठी प्रशासनाने तातडीने योग्य उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे वाघेरे यांनी नमूद केले आहे. प्रभाग क्रमांक २१ पिंपरी गाव हा लोकसंख्येच्या दृष्टीने दाट वस्तीचा भाग असून, येथे विविध सामाजिक घटक वास्तव्यास आहेत. यापूर्वीही या प्रभागात काही संवेदनशील घटना घडल्याचा संदर्भ देत, त्या पार्श्वभूमीवर अतिरिक्त पोलीस बंदोबस्त, कडक नजर ठेवणे आणि प्रभागाला ‘संवेदनशील’ म्हणून घोषित करणे अत्यावश्यक असल्याची मागणी करण्यात आली आहे.

निवडणूक काळात कोणत्याही प्रकारचा दबाव, प्रलोभन किंवा धमकी यामुळे मतदारांवर परिणाम होऊ नये, तसेच सर्व उमेदवार व कार्यकर्त्यांना समान आणि सुरक्षित वातावरण मिळावे, ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांचे म्हणणे आहे. त्यामुळे प्रशासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

दरम्यान, या मागणीवर निवडणूक प्रशासन आणि पोलीस आयुक्तालय काय भूमिका घेते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले असून, महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा विषय महत्त्वाचा ठरणार आहे.

## महापालिका प्रभाग 7 मध्ये

# राष्ट्रवादीच्या प्रचाराला उत्स्फूर्त प्रतिसाद!

### मिशन-PCMC : हरी ओम सोसायटी, दिघी–भोसरी रोड येथे उमेदवारांचे जंगी स्वागत



। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्रभाग क्रमांक सातमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचाराला चांगलाच वेग आला असून हरी ओम सोसायटी, दिघी–भोसरी रोड परिसरात नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अ प्रवर्गातील उमेदवार विराज लांडे यांच्यासह ब, क आणि ड प्रवर्गातील उमेदवारांनी सोसायटी परिसरात भेटीगाठी घेत नागरिकांशी थेट संवाद साधला.**

या प्रचारादरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांचे नागरिकांनी जल्लोषात स्वागत केले. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, ड्रेनेज, आरोग्य सुविधा तसेच परिसरातील विविध मूलभूत प्रश्न नागरिकांनी उमेदवारांसमोर मांडले.

विराज लांडे, अनुराधा लांडगे, अश्विनी फुगे आणि अमोल डोळस

> “प्रभाग क्रमांक सातमधील प्रत्येक नागरिकाचा विश्वास हीच आमची खरी ताकद आहे. पाणी, रस्ते, स्वच्छता, आरोग्य आणि मूलभूत सुविधा या प्रश्नांवर प्राधान्याने काम करून प्रभागाचा सर्वांगीण आणि संतुलित विकास साधण्याचा आमचा संकल्प आहे. नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आम्ही सदैव त्यांच्या सोबत उभे राहू.”
>
> **—विराज विश्वनाथ लांडे,**
> उमेदवार, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, प्रभाग क्रमांक ७.

## प्रभाग २५ मध्ये भाजपला आयटीयंन्सचा वाढता पाठींबा

### लोकांच्या संपर्कात अन विकासाची दूरदृष्टी असलेले लोकप्रतिनिधी हवेत : आयटीयन्सची मागणी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**वाकड प्रभाग क्रमांक २५ मधील वाकड, ताथवडे, पुनावळे परिसरात राहणाऱ्या आणि हिंजवडीसह परिसरात आयटीमध्ये काम करणाऱ्या नागरिकांनी प्रभाग क्रमांक २५ मधील भाजप उमेदवारांना पूर्ण पाठिंबा देत सलग दुसऱ्यांदा महापालिकेत भाजपाला संधी देणार असल्याचा निर्धार व्यक्त केला. वाकड, ताथवडे आणि पुनावळे भागातल्या विविध सोसायट्यामध्ये भाजप पॅनलचा झंझावती प्रचार सध्या सुरू आहे. उमेदवार राहुल कलाटे, कुणाल वाव्हळकर, श्रुती वाकडकर आणि रेश्मा भुजबळ यावेळी उपस्थित होते.**




वाकड, ताथवडे आणि पुनावळे भागातील विविध गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये भाजप पॅनलचा झंझावाती प्रचार सध्या सुरू असून, या प्रचारादरम्यान नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळत आहे. या भेटीगाठींच्या वेळी भाजपचे उमेदवार राहुल कलाटे, कुणाल वाव्हळकर, श्रुती वाकडकर आणि रेश्मा भुजबळ उपस्थित होते. उमेदवारांनी सोसायटीतील नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी, समस्या आणि अपेक्षा जाणून घेतल्या.

यावेळी नागरिकांनी स्पष्टपणे सांगितले की, केवळ निवडणुकीच्या काळात आश्वासने देणारे नेते नकोत, तर नेहमी आमच्या संपर्कात राहणारे, आमचे प्रश्न ऐकून घेणारे आणि त्यावर ठोस व कायमस्वरूपी उपाययोजना करणारे नेतृत्व आम्हाला हवे आहे. या अनुषंगाने सोसायटीमधील महिलांनी माजी नगरसेवक राहुल कलाटे यांच्या कार्यकाळातील कामगिरीबद्दल समाधान व्यक्त केले. रस्ते, पाणीपुरवठा, वाहतूक, ड्रेनेज, कचरा व्यवस्थापन यांसारख्या नागरी प्रश्नांवर वेळोवेळी दिलेल्या प्रतिसादामुळे नागरिकांमध्ये विश्वास निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले. विशेषतः आयटी क्षेत्रात कार्यरत असलेल्या नागरिकांनी विकासकामांबाबत सातत्य आणि गती महत्त्वाची असल्याचे मत व्यक्त केले. केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महापालिकेतही भाजपचेच सरकार असल्यास विकासकामांना वेग मिळतो, निधीची अडचण येत नाही आणि मोठे प्रकल्प लवकर मार्गी लागतात, असे नागरिकांनी नमूद केले. त्यामुळेच शहराच्या सर्वांगीण विकासासाठी एकाच पक्षाचे सरकार आवश्यक असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले.उमेदवार राहुल कलाटे यांनी यावेळी बोलताना सांगितले की, वाकड, ताथवडे आणि पुनावळे परिसराचा नियोजित विकास, वाहतूक कोंडी कमी करणे, पायाभूत सुविधा मजबूत करणे आणि नागरिकांच्या दैनंदिन समस्या सोडवणे हेच आपले प्राधान्य आहे. नागरिकांचा मिळणारा पाठिंबा ही जबाबदारी अधिक वाढवणारा असून, आगामी काळात अधिक प्रभावीपणे काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. एकूणच वाकड प्रभाग क्रमांक २५ मध्ये भाजप उमेदवारांना मिळणारा सकारात्मक प्रतिसाद पाहता, या प्रभागात निवडणूक चांगलीच रंगत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक:

# “सुलक्षणा शिलवंत धर: विकासासाठी निर्भीड वचन

## .आरोग्य, शिक्षण आणि व्यसनमुक्त समाज ही प्रचाराची मुख्य सूत्रे

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीत प्रभाग क्रमांक २०, संत तुकाराम नगर येथून डॉ. सुलक्षणा शिलवंत धर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाच्या ‘तुतारी’ चिन्हावर निवडणूक लढवण्याची अधिकृत घोषणा केली आहे. घोषणेनंतर त्यांनी प्रचारात आघाडी घेतली असून, स्थानिक नागरिकांकडून त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.**




> “आरोग्य, शिक्षण आणि सुरक्षित भविष्य — ही केवळ आश्वासनं नाहीत, तर माझी जबाबदारी आहे. सामान्य माणसाच्या जीवनात खरा बदल घडवण्यासाठी मी प्रामाणिकपणे, निर्भीडपणे आणि सातत्याने काम करेन.”
> **—सुलक्षणा शिलवंत-धर,** उमेदवार, राष्ट्रवादी श.प. प्रभाग- 20.

आरोग्य, शिक्षण आणि व्यसनमुक्त समाज ही त्यांच्या प्रचाराची मुख्य सूत्रे असून, त्यांनी मांडलेली भूमिका प्रभावी ठरत आहे. “YCM रुग्णालय हे केवळ उपचाराचं ठिकाण नाही, तर हजारो कुटुंबांची शेवटची आशा आहे,” असे सांगत त्यांनी रुग्णालयात अधिक कर्मचारी नियुक्ती, नवीन कॅन्सर व किडनी विभाग सुरू करणे तसेच NICU चा विस्तार करण्यावर भर दिला. मजबूत आरोग्यव्यवस्था उभारणे ही आपली वैयक्तिक जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शिक्षणाच्या मुद्द्यावर बोलताना डॉ. धर यांनी पंडित दीनदयाळ शाळेचे मराठी–इंग्रजी माध्यमात रूपांतर करून शिक्षण सर्वांसाठी खुले करण्याचा निर्धार व्यक्त केला. “महागड्या फीमुळे कोणाचंही स्वप्न थांबू नये. शिक्षण हा व्यवसाय नाही, तो प्रत्येक मुलाचा हक्क आहे,” अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली.

तसेच, परिसरात वाढत असलेल्या अमली पदार्थांच्या समस्येकडे लक्ष वेधत त्यांनी ड्रग्सविरोधातील लढा तीव्र करण्याचा इशारा दिला. “ड्रग्स दिसत नाहीत, पण ते आपल्या मुलांचं भविष्य गिळत आहेत. ही लढाई उद्याची नाही, आजची आहे,” असे सांगत मुलांचे भविष्य वाचवणे ही सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

प्रचारादरम्यान त्यांच्या स्पष्ट भूमिका, सामाजिक जाणिवा आणि विकासाभिमुख दृष्टिकोनामुळे मतदारांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून, प्रभाग क्रमांक २० मध्ये निवडणूक चुरशीची ठरण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

---

## सीमेड्यू स्कूल ऑफ प्रो-एक्सप्रेशनिझमचा डिझाईन एज्युकेशन फेस्टिव्हल २०२६ मध्ये सक्रिय सहभाग

### शिक्षण विश्व: डिझाईन, शिक्षण आणि सर्जनशीलतेचा उत्सव पुण्यात

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**इंडस्ट्री-आधारित सर्जनशील शिक्षणासाठी ओळखली जाणारी सीमेड्यू स्कूल ऑफ प्रो-एक्सप्रेशनिझम ही संस्था पुण्यात आयोजित डिझाईन एज्युकेशन फेस्टिव्हल २०२६ मध्ये जनरल स्पॉन्सर तसेच सक्रिय सहभागी म्हणून सहभागी झाली आहे. हा महोत्सव १० व ११ जानेवारी २०२६ रोजी कळाग्राम, पी. एल. देशपांडे उद्यान, पुणे येथे होत आहे.**




या फेस्टिव्हलमध्ये एज्युकेशन एक्स्पो, डिझाईन टॉक्स व पॅनल डिस्कशन्स, विविध कार्यशाळा तसेच डिझाईन फ्लिया यांचा समावेश असून, शिक्षण, उद्योग आणि सर्जनशीलतेचा अनोखा संगम अनुभवायला मिळणार आहे.

सीमेड्यूचे चेअरमन डॉ. सुशांत पाटील आणि मॅनेजिंग डायरेक्टर ॲड. अनुजा पाटील यांनी या महोत्सवातील सहभागाबद्दल सीमेड्यूच्या संपूर्ण टीमला, विद्यार्थ्यांना व सहभागी सर्वांना शुभेच्छा दिल्या आहेत. अशा व्यासपीठांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नाविन्यपूर्ण विचारसरणी, उद्योगाभिमुख दृष्टिकोन आणि आत्मविश्वास विकसित होतो, असे त्यांनी नमूद केले.

महोत्सवातील डिझाईन पॅनल चर्चांमध्ये सीमेड्यूकडून दीप अष्टाणी सहभागी होत असून, डिझाईन शिक्षणातील आधुनिक प्रवाह, उद्योगाच्या अपेक्षा आणि भविष्यातील संधी यावर ते आपले विचार मांडणार आहेत.

सीमेड्यूचे विद्यार्थी या फेस्टिव्हलमध्ये विशेष सहभाग घेत असून, ते आपली सर्जनशील प्रोजेक्ट्स सादर करणार आहेत. तसेच विविध कार्यशाळांमध्ये सहभागी होऊन भेट देणाऱ्या पाहुण्यांशी संवाद साधणार आहेत. याशिवाय, सीमेड्यूच्या विद्यार्थ्यांचा लाईव्ह म्युझिक बँड परफॉर्मन्स हे या महोत्सवाचे




खास आकर्षण ठरणार असून, कला, डिझाईन आणि संगीत यांचा अनोखा संगम पाहायला मिळणार आहे.

डिझाईन शिक्षणात रस असलेल्या विद्यार्थी, पालक आणि डिझाईन प्रेमींना सीमेड्यूच्या स्टॉल क्रमांक २० ला भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे. येथे अत्याधुनिक डिझाईन कोर्सेसची माहिती, अनुभवी प्राध्यापकांशी संवाद तसेच विद्यार्थ्यांचे प्रत्यक्ष काम पाहण्याची संधी उपलब्ध होणार आहे. सकाळी १० ते रात्री ८ या वेळेत, मोफत प्रवेशासह आयोजित करण्यात आलेला डिझाईन एज्युकेशन फेस्टिव्हल २०२६ हा सर्जनशीलता, शिक्षण आणि प्रेरणेचा उत्सव ठरणार आहे.

## केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री

# रामदास आठवले यांच्या रोड शोला उत्स्फूर्त प्रतिसाद

## मिशन- PCMC: पिंपरीगाव प्रभाग क्र.21 मध्ये भाजपचे पारडे जड

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) चे राष्ट्रीय अध्यक्ष मा. श्री. रामदास आठवले यांच्या उपस्थितीत आज (दि.१०) पिंपरीतील प्रभाग क्रमांक २१ मध्ये भव्य रोड शोचे आयोजन करण्यात आले. या रोड शोमुळे संपूर्ण परिसर भाजप व आरपीआय (आठवले) युतीमय झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.**



~~पिंपरी गाव, वैभव नगर, मिलिंद~~ नगर, जिजामाता हॉस्पिटल परिसर, अशोक थिएटर आदी भागांतून हा रोड शो मोठ्या उत्साहात पार पडला. प्रभाग क्रमांक २१ मधील महायुतीचे अधिकृत उमेदवार उषाताई वाघेरे, मोनिकाताई निकाळजे, गणेश ढाकणे आणि नरेश पंजाबी यांच्या प्रचारार्थ या रोड शोचे आयोजन करण्यात आले होते.

या रोड शोला माजी महापौर संजोग वाघेरे पाटील, माजी उपमहापौर प्रभाकर वाघेरे, माजी उपमहापौर अमर मुलचंदाणी, युवा नेते बबलू सोनकर, यांच्यासह मोठ्या संख्येने भाजपा आरपीआयचे कार्यकर्ते उपस्थित होते. केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या उपस्थितीमुळे या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. “विजयभव”च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. शगुन चौक येथून रोड शोची सुरुवात होऊन साई चौक, साई स्टील, अशोक टॉकीज, महाराष्ट्र विद्यालय, गंगवा चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, नवी काळेवाडी पूल, जमतानी चौक आणि मिलिंद नगर या मार्गांवरून मार्गक्रमण करत मोठ्या जल्लोषात रोड शोचा समारोप झाला. या भव्य रोड शोमुळे भाजप–आरपीआय (आठवले) युतीचे प्रभावी शक्तीप्रदर्शन झाले असून, प्रभागातील चारही उमेदवारांची निवडणुकीतील बाजू अधिक भक्कम झाल्याचे राजकीय निरीक्षकांकडून सांगितले जात आहे.

